





# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा





रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. ०३.०४.२०२५ | अंक नं. ३३२ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020




# शेती कर्जाची वसुली सुरू केल्यास १४ एप्रिलपासून महायुती सरकारच्या जाहीरनाम्याची होळी करणार

## कर्जदार शेतकरी, लाडक्या बहिणी, बेरोजगार तरुण, ज्येष्ठ नागरिकांसह इतर घटकांची शासनाकडून फसवणूक



नगर – महाराष्ट्राच्या विधानसभा २०२४ निवडणुकीमध्ये महायुतीच्या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. असे असताना अर्थमंत्री अजित पवार यांनी शेतकऱ्यांना कर्जबाकी भरण्याचे आदेश दिले आहेत. या बरोबर जाहिरनाम्यातील इतर आश्वासनांच्या पुर्ततेबाबत अशीच अवस्था आहे. महायुती सरकारने जनतेच्या केलेल्या फसवणुकीचा निषेध करण्यासाठी १४ एप्रिल रोजी महायुतीचा सरकारच्या जाहीरनाम्याची होळी करून 'राज्यव्यापी आंदोलन' करण्यात येणार असल्याचा इशारा स्वतंत्र भारत पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट यांनी महाराष्ट्र शासनाला निवेदनाद्वारे दिला आहे.

महाराष्ट्रात झालेल्या विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) व शिवसेना (एकनाथ शिंदे) हे प्रमुख पक्ष असलेल्या महायुती गठबंधानने जाहीरनामा प्रसिद्ध केला होता. या जाहीरनाम्यात शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याचे लेखी आश्वासन दिले आहे, मोफत वीज देण्याचे आश्वासन दिलेले आहे. तसेच सोयाबीनला २०% बोनस देऊन ६००० रुपये प्रति क्विंटल दर देण्याचे छापलेले आहे. याबाबत अजित पवार व देवेंद्र फडणवीस व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर सभांमध्ये घोषणा केल्या आहेत. मात्र वरील पैकी कोणतेही आश्वासन पूर्ण केलेले नाही. उलट शेतकऱ्यांना ३१ मार्चअखेर पीक कर्जफेड न केल्यास वसुलीच्या नोटीसा पाठवण्याचा इशारा दिला आहे. निवडणुकीत केवळ मते मिळविण्यासाठी शेतकऱ्यांची घोर फसवणूक केली आहे.

फक्त शेतकरीच नाही तर लाडकी बहिण योजनेत महिलांना २१०० रुपये प्रति महिना देण्याचे जाहीरनाम्यात लेखी दिले आहे. महिलांना २१०० रुपये तर नाहीच मिळाले, उलट १५०० रुपये सुद्धा मिळत नाहीत हे दिसून येत आहे. बेरोजगारांना १० हजार रुपये प्रतिमहिना भत्ता, ज्येष्ठ नागरिकांना दरमहा २१०० अनुदान देणार, कृषी निविष्टांवर आकारला जाणारा राज्याचा 'जीएसटी' माफ करणार, वन्य प्राण्यांचा त्रास व त्यापासून होणारे नुकसान टाळण्यासाठी उपाययोजना करणार, अशी अनेक आश्वासने शेतकऱ्यांना जाहीरनाम्यात देण्यात आली आहेत.

सरकार ही आश्वासने पूर्ण करण्याऐवजी शेतकऱ्यांना धमकावत आहे, याचाही जाहीर निषेध करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांबरोबर फसवणूक झालेल्या लाडक्या बहिणी, बेरोजगार तरुण, ज्येष्ठ नागरिक व इतर घटकांनी युती शासनाचा निषेध करून जाहीरनाम्याचे पालन करा, असा सूचक इशारा या आंदोलनाद्वारे द्यावयाचा आहे.

८ दिवसात दिलेली आश्वासने शासनाने पूर्ण करावीत व कर्ज आणि वीजबिल वसुलीची कारवाई त्वरित स्थगित ठेवावी, या मागणीचे निवेदन अनिल घनवट यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री व कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना पाठविले आहे.

### वीज बिल वसुलीच्या नोटिसांचीही होळी करणार

वरील विषयाबाबत ८ दिवसात राज्य शासनाने निर्णय जाहीर न केल्यास १४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनापासून प्रत्येक गावात महायुती सरकारचा जाहीरनामा व बँकांनी दिलेल्या वसुलीच्या नोटीसांची होळी करण्याचे आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

### आंदोलनात सहभागी व्हावे

स्वतंत्र भारत पक्ष व शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन होणार असले तरी फसवणूक झालेल्या सर्व महिला, युवक, बेरोजगार तरुण, कर्जदार शेतकरी व ज्येष्ठ नागरिकांनी या आंदोलनात सहभागी व्हावे, असे आवाहन स्वतंत्र भारत पक्ष व शेतकरी संघटनेच्या नेत्यांनी केले आहे.





















जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## लेखक लिहितो म्हणजे काय? वाचा-लिहा

थोडक्यात असं... या कादंबरीत माझे आवडते लेखक सु. शि. म्हणतात- लेखक लिहितो म्हणजे काय करतो? राईट. आपल्या मनातील विचारांना तो आपल्या कुवतीनुसार सुंदर असं शब्दरूप देतो. पण, माणसाच्या मनात विचार निर्माण होतात. त्याला एखाद्या विवक्षित विषयाचं ज्ञान असतं म्हणजे काय? ते त्याला कसं प्राप्त होतं?

वाचन, श्रवण, स्वानुभव, परानुभव अन् कल्पना ही ज्ञानार्जनाची माध्यमं! की नाही? मग त्यातल्या वाचनाचा फायदा घेऊन लेखकानं एखादी कलाकृती सजवली तर बिघडलं कुठं? यासंदर्भात महत्त्वाचा मुद्दा-

आज इंग्रजी ही जागतिक भाषा आहे. स्थानिक भाषांची प्रादेशिक मर्यादा तिला नाही. ती जगभर फिरू शकते. अर्थातच इतर भाषेतील लेखकांवर इंग्रजी वाङ्मयाचा




परिणाम होणं केवळ अपरिहार्य आहे.

पण याचा अर्थ इतर भाषांमधून स्वतंत्र प्रज्ञा नाही, असा नाही. आज मराठी जागतिक भाषा असती तर मराठी लेखकांच्या वाङ्मयाचा इंग्रजी लेखकांनीही असाच उपयोग करून घेतला असता. विचार कोणत्याही भाषेत असले तरी ते नवीन असतील, बुद्धिवान असतील, नि आपल्या मातृभाषेत ते आलेले नसतील तर ते आणणं हे महत्त्वाचं आहे, असं माझं मत आहे.

तात्पर्य, मनाच्या गाभाऱ्यातून वाचन, मनन, चिंतनाच्या समुद्रातून आलेले अक्षरमोती कागदावर टिपणं म्हणजेच लेखन... बघा पटतंय का?





छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील गतीरोधकांमुळे अपघातांना निमंत्रण असल्याचे निवेदन राष्ट्रवादीच्या शिष्टमंडळाने सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता भरतकुमार बावीस्कर यांना दिले.

# छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील गतिरोधकांमुळे अपघातांना निमंत्रण

### तात्काळ गतीरोधक हटवा अन्यथा तीव्र आंदोलन

नगर - छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील महापालिका ते सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयादरम्यान चुकीच्या पध्दतीने टाकण्यात आलेले गतीरोधक त्वरीत हटविण्याची मागणी राष्ट्रवादी ओबीसी विभागातर्फे करण्यात आली आहे. आ. संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादीच्या शिष्टमंडळाने अधीक्षक अभियंता भरतकुमार बावीस्कर यांना मागणीचे निवेदन दिले. गतीरोधक अपघातांना कारणीभूत ठरुन नागरिकांना सोयी ऐवजी त्रास होत असल्याचे स्पष्ट करण्यात आले. यावेळी ओबीसी विभागाचे शहर जिल्हाध्यक्ष अमित खामकर, महिला जिल्हा चिटणीस अंबिका भिसे, महिला जिल्हा उपाध्यक्ष स्मिता वाळेकर, महिला सरचिटणीस स्वाती पवार, सहसचिव भारती दिवटे, बाळासाहेब खताडे, विलास शिंदे, शंकर तुपे, भिमराव भगत, बिपिन जठार, पद्माकर गवळी, राहुल शहाणे आदी उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर महामार्गावर बीटीआर व शासकीय विश्रामगृह जवळ असलेल्या गतीरोधकामुळे वयोवृद्ध, शालेय विद्यार्थी, सामान्य नागरिक व महिलांना त्रास होत आहे. गतीरोधक चूकीच्या पध्दतीने शासकीय नियमांना डावलून उभारण्यात आलेले असून, यामुळे त्यांचा अंदाजा येत नसल्याने अनेक लहान-मोठे अपघात घडत आहे. तर या गतीरोधकामुळे अपघात होवून नागरिकांचा जीव जाण्याचा धोका निर्माण झाला आहे.

भरतकुमार बावीस्कर यांनी या प्रश्नाची तात्काळ दखल घेऊन गतीरोधक नागरिकांच्या सोयीसाठी होते. मात्र त्यामुळे गैरसोय होत असेल, तर ते हटविणार असल्याचे आश्वासन दिले. गतीरोधक तात्काळ न हटविल्यास आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# 'जनसुरक्षा विधेयका'च्या विरोधात २२ एप्रिल रोजी राज्यभर 'निदर्शने'

## सत्तेला विरोध करणाऱ्या विरोधकांचा आवाज दाबणारे, जनतेच्या मूलभूत हक्कांवर गदा आणणारे विधेयक



सुभाष लांडे

नगर - महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक २०२४ हे घटनाविरोधी आणि लोकशाहीस बाधक विधेयक असल्याचा आरोप करुन भारतीय कम्युनिस्ट पक्षासह डाव्या पुरोगामी पक्ष संघटनांच्या वतीने २२ एप्रिलला राज्यभर जिल्हाधिकारी व तहसील कार्यालया समोर निदर्शने केली जाणार आहे. या आंदोलनात माकप, भाकप, शेकाप, सकप, लाल निशाण पक्षांसह विविध डाव्या व लोकशाहीवादी पक्ष संघटना सहभागी होणार आहेत.

हे विधेयक सत्तेला विरोध करणाऱ्या विरोधकांचा आवाज दाबणारे, जनतेच्या मूलभूत हक्कांवर गदा आणणारे आहे. त्यामुळे हे विधेयक रद्द करावे, या मागणीसाठी राज्यभर व्यापक लढा उभारण्याचा निर्धार करण्यात आला असून, तालुक्याच्या ठिकाणी तहसील कार्यालये व शहरातील जिल्हाधिकारी कार्यालया समोर होणाऱ्या २२ एप्रिलच्या आंदोलनात डाव्या व लोकशाहीवादी पक्ष संघटनांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

मुंबईतील भुपेश गुप्ता भवन येथे आयोजित बैठकीत या आंदोलना निर्णय घेण्यात आला. यावेळी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते कॉम्रेड प्रकाश रेड्डी अध्यक्षस्थानी होते. बैठकीला भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, लाल निशाण पक्ष, भारतीय महिला फेडरेशन, अखिल भारतीय जनवादी महिला संघटना, भारत जोडो अभियान, कामगार एकता कमिटी, नारी अत्याचार विरोधी मंच आदी पक्ष व संघटनांचे पदाधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते.

या बैठकीत महाराष्ट्र जनसुरक्षा विधेयक २०२४ या विषयावर सविस्तर चर्चा झाली कुठल्याही परिस्थितीत हे विधेयक पास होता कामा नये, मोठ्या बहुमताने निवडून आलेले भाजप सरकार राज्यात या विधेयकाच्या आधारे कायदा करून विरोधकांचा आवाज दाबून कार्पोरेट धार्जिणे धोरणे राबवण्यासाठी हुकूमशाही आणण्याच्या प्रयत्नात आहे. पुरोगामी महाराष्ट्र हे कदापि सहन करणार नाही. १९१८ साली ब्रिटिश सरकारने अशाच प्रकारचे विधेयक पब्लिक सेफ्टी बील या नावाने आनले होते. त्या वेळी भगतसिंग आणि बटुकेश्वर यांनी असेम्बलीत आवाज करणारा बॉम्ब टाकून सरकारचे व सभागृहाचे लक्ष वेधले होते. त्यामुळे ब्रिटिश सरकारला विधेयक मागे घ्यावे लागले होते. तशाच प्रकारच्या या विधेयकाला विरोध करण्यासाठी जनसुरक्षा विधेयक विरोधी समिती स्थापन करून तातडीने कृती कार्यक्रम हाती घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

विभागीय मेळावे घेऊन या विधेयकाला विरोध का करायचा, याबाबत जनतेपर्यंत माहिती पोहोचवून जनमत तयार करण्याचे यावेळी ठरविण्यात आले. तसेच ३० जून रोजी मुंबई येथे सुरू होणाऱ्या विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विराट मोर्चा काढण्याचाही निर्णय घेण्यात आला. तसेच समाज माध्यमांमधून याबाबत प्रचार-प्रसार करुन, सर्व आमदारांच्या घरावर व कार्यालयावर जाऊन हे विधेयक रद्द करावे म्हणून विधानसभा, विधान परिषदेत भूमिका मांडण्याबाबत दबाव निर्माण करण्याचे निश्चित करण्यात आले.

यावेळी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सेक्रेटरी कॉ. ॲड. सुभाष लांडे, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सेक्रेटरी कॉ. डॉ. अजित नवले, आयटकचे राष्ट्रीय सेक्रेटरी कॉ. सुकुमार दामले, शेकापचे ॲड. राजेंद्र कोरडे, कॉ. विजय कुलकर्णी, कॉ. शैलेंद्र कांबळे, कॉ. डॉ. एस.के. रेगे, कॉ. चारुल जोशी, कॉ. गिरीश भावे, कॉ. लता भिसे-सोनवणे, डॉ. अनुराधा रेड्डी, संध्या गोखले, सुजाता गोठुसकर, सूर्यकांत के. शिंगे, कॉ. प्रा. सुभाष जाधव, संकल्पना कऱ्हाडे, प्राची हातिवलेकर, गणेश बाईत, सुनिल मन्वर आदी प्रमुख उपस्थित होते. तसेच सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाचे कॉ. किशोर ढमाले, श्रमिक मुक्ती दलाचे कॉ. भारत पाटणकर, मानवाधिकार कार्यकर्त्या तिस्ता सेटलवाड, उल्का महाजन यांनी फोनवर संपर्क साधून जनसुरक्षा विधेयक विरोधी समितीने ठरवलेल्या आंदोलनामध्ये सक्रिय सहभागी होण्याचे कळवले आहे. राज्य विधिमंडळ सचिवालयाच्या जाहिरात व सुचनेनुसार नुसार आज अखेर दिलेल्या तारखेला या विधेयकाला प्रत्यक्ष व दिलेल्या संकेतस्थळावर सुचना व विरोध नोंदवला असल्याची माहिती कॉ. ॲड. सुभाष लांडे यांनी दिली आहे.

## दत्तात्रय सामलेटी यांचे अल्प आजाराने निधन



नगर - दातरंगे मळा येथील रहिवासी अ.नगर पद्मशाली वधुवरचे मार्गदर्शक दत्तात्रय रामकृष्ण सामलेटी (वय ७५) यांचे ३ एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले.

त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, २ मुली, नातवंडे असा परिवार आहे.

# राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांची निवड यादी जाहीर

नगर - महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्यावतीने घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजनेसाठी पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांची निवड यादी १ एप्रिल रोजी जाहीर करण्यात आली आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी दिली आहे.

राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी २२ डिसेंबर २०२४ रोजी झालेल्या परीक्षेसाठी २ लाख ४८ हजार ७५८ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली होती. त्यापैकी महाराष्ट्रातील ११ हजार ६८२ विद्यार्थ्यांचा शिष्यवृत्ती कोटा भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाकडून निश्चित करण्यात आला होता. महाराष्ट्र राज्याच्या आरक्षणानुसार संबंधित संवर्गातील विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. सबंधित संवर्गात दिव्यांगांसाठी ४ टक्के आरक्षण समाविष्ट आहे.

विद्यार्थ्यांना निकाल महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे अधिकृत संकेतस्थळ www.mscepune.in व https://mscenmms.in उपलब्ध करून देण्यात आला आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना (दरमहा एक हजार रूपये ) दरवर्षी १२ हजार रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे. शिष्यवृत्ती वितरणाचे काम शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) तसेच शालेय शिक्षण संचालक (योजना) यांच्याद्वारे केले जाते, असेही श्रीमती ओक यांनी कळविले आहे.


## प्रवीण लोढा (पुंडीवाला) यांचे अल्प आजाराने निधन



नगर - सथ्था कॉलनी येथील रहिवासी प्रवीण शंकरलाल लोढा (पुंडीवाला) (वय ५०) यांचे ३१ एप्रिल रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ भाऊ, भावजया, १ बहीण असा परिवार आहे. ते सतिश व संजय लोढा यांचे बंधू होत तर वैभव मुनोत यांचे मामा होत. ते समाधान ट्रेडींग कंपनी तेलाचे व्यापारी म्हणून प्रसिद्ध होते.

## हेमंत गुंदेचा यांचे मरणोत्तर नेत्रदान व देहदान



नगर - एम. जी. रोड येथील नंदू बंधू टेलर्सचे संचालक हेमंत मोतीलाल गुंदेचा (वय ७०) यांचे ३ एप्रिल रोजी दुःखद निधन झाले. समाजसेवेची भावना जपत त्यांनी मृत्यूनंतर नेत्रदान व देहदान करण्याचा निर्णय घेतला होता, आणि तो संकल्प कुटुंबियांनी पूर्ण केला. त्यांच्या महान निर्णयामुळे अनेक गरजू रुग्णांना नवीन जीवन मिळणार आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ विजय गुंदेचा, पुतणे विशाल गुंदेचा तसेच भाऊ-बहिणी, इतर पुतणे, पुतण्या असा परिवार आहे.आपल्या संयमी स्वभावामुळे व मनमिळावू वृत्तीमुळे ते सर्वांच्या प्रिय होते. त्यांनी व्यवसायासोबतच समाजसेवा आणि माणुसकीचे नाते जपले.

## छायाबाई कुलट यांचे अल्प आजाराने निधन



नगर - कल्याण रोड गणपती मंदिरा समोरील छायाबाई बाबासाहेब कुलट (वय ५६) यांचे १ एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर खातगाव टाकळी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. जिल्हा परिषदेतील आरोग्य सेवक प्रशांत कुलट यांच्या त्या मातोश्री होत.



**हनुमान चालिसा पाठ**

**शुक्रवार दि. ०४/०४/२०२५**
**रात्री ८.३० ते १०.३०**

**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**
**छत्रपती शिवराय तरुण मंडळ**, गाडगीळ पटांगण, नालेगाव दत्तात्रय मुदगल- ९८२२४४९६४९.

**मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एमआयडीसी, अहिल्यानगर**
**अशोक दत्तात्रय शहापुरे**, श्री राम मंदिर, पंचवटीनगर, भिस्तबाग चौक, मो. ९४२०९५०९१५.

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) श्रीराम मंदिर, नवीपेठ**
**नवयुग मित्र मंडळ, परेश सुनिल लोखंडे,** कोठीची तालीम, माळीवाडा.

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, सारडा गल्ली, गंजबाजार**
**श्री जय हनुमान युवा प्रतिष्ठान**, कराचीवाला नगर, महेश थिएटरच्या जवळ, मो. ९४२३७९२५००, ८१८०००८००५.

## मोबाईल टॉवरवरील बॅटरीची चोरी

नगर - नगर दौंड रोडवरील अरणगाव परिसरातील इंडस मोबाईल टॉवरवरील ९ हजार ५०० रुपये किमतीची बॅटरी कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. ही घटना ८ फेब्रुवारी रोजी रात्री दीड वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत सिक्युरिटी सुपरवायझर परमेश्वर सुधाकर राख (वय ३९, रा. पुणे, हल्ली रा.निंबोडी, ता. नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, अरणगाव शिवारातील इंडस मोबाईल टॉवर क्रमांक १२४३४४६ ची ९ हजार ५०० रुपये किमतीची बॅटरी कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरून नेली.

याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात परमेश्वर राख यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता ३०३ (२) प्रमाणे चोरीच्या गुन्ह्याची नोंद केली. अधिक तपास महिला पोलीस नाईक एम एन काळे या करीत आहे.

# उच्च न्यायालयाच्या आदेशाने २००५ पूर्वी नियुक्त शिक्षक, शिक्षकेतरांना जुनी पेन्शनचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा

## जुनी पेन्शनसाठी स्क्रुटिनी करिता प्रस्ताव सादर करण्यासाठी पत्र काढावे, कोअर कमिटीचे शिक्षणाधिकारी यांना निवेदन



उच्च न्यायालयाच्या आदेशाने २००५ पूर्वी नियुक्त शिक्षक, शिक्षकेतरांना जुनी पेन्शनचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

नगर - मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व त्यानंतर अनुदानावर आलेल्या मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना जुनी पेन्शन योजनेचा लाभ मिळण्यासाठी प्रस्ताव स्क्रुटिनी करिता शासनाकडे पाठविण्याकामी जिल्ह्यातील संस्थांना अवगत करण्याची मागणी जुनी पेन्शन योजना कोअर कमिटीच्यावतीने करण्यात आली आहे.

या मागणीसाठी शिक्षकांच्या शिष्टमंडळाने माध्यमिकचे शिक्षण अधिकारी अशोक कडूस, वेतन पथक अधीक्षक रामदास म्हस्के, कार्यालयीन अधीक्षक महावीर धोदाड व उपशिक्षणाधिकारी संध्या भोर यांची भेट घेऊन निवेदन देण्यात आले. यावेळी राजेंद्र लांडे, आप्पासाहेब शिंदे, बाबासाहेब बोडखे, सुधीर काळे, रमजान हवालदार, जुनी पेन्शन कोअर कमिटीचे राज्य सचिव महेंद्र हिंगे, कार्याध्यक्ष संजय ईघे, समन्वयक सुनील भोर, राज जाधव, देविदास खेडकर, सुनील दानवे, भाऊसाहेब शिंदे, नवनाथ कोटकर, बाबासाहेब गुळवे, उल्हास गुळवे, सुनील म्हसे, जाकीर सय्यद, रवींद्र औताडे, भगवान रसाळ, सुदाम दळवी, आबासाहेब गायकवाड, संतोष हराळ, आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.


शिक्षण अधिकारी अशोक कडूस यांनी वरिष्ठांचे मार्गदर्शन घेऊन न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे प्रस्ताव स्क्रुटिनी तयार केले जाणार असून, याबाबत संस्थांना देखील पत्र काढले जाणार असल्याचे आश्वासन शिक्षकांच्या शिष्टमंडळास दिले.

२७ फेब्रुवारी रोजी उच्च न्यायालय मुंबई यांनी जुनी पेन्शन बाबत निर्णय दिला असून, त्यामध्ये १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व त्यानंतर शंभर टक्के अनुदानावर आलेले मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांना जुनी पेन्शन योजना (नियम १९८२) लागू करणे करिता शिक्षणाधिकारी यांना उपसंचालक यांच्याकडे स्क्रुटिनी सादर करण्याचे आदेश झालेले आहे.

यामध्ये माध्यमिक शिक्षक, कर्मचाऱ्यांचे प्रस्ताव निकालापासून ४५ दिवसात संस्थाने विविध कागदपत्रासह शिक्षण अधिकारी कार्यालयाकडे सादर करावे व उच्च माध्यमिकचे प्रस्ताव उपसंचालक कार्यालयाकडे सादर करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहे. या निकाला अगोदर लार्जर बेंचचा निकाल लागलेला आहे. तसेच शंभर टक्के अनुदान असलेल्या शाळेवरील अनेक कर्मचाऱ्यांचे निकाल कर्मचाऱ्यांच्या बाजूने लागलेले असून देखील सदर दोन्ही प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात अंतिम सुनावणीसाठी प्रलंबित आहे, असे असून देखील २७ फेब्रुवारी च्या निकालात सर्व कर्मचाऱ्यांसाठी आशादायक निकाल लागलेला असल्याचे संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे.

न्यायालयीन प्रक्रियेत आपला जिल्हा मागे राहू नये व स्क्रुटिनीसाठी आपला प्रस्ताव वेळेत दाखल करावा आणि पोहच घ्यावी. केवल स्क्रुटिनी न झाल्यामुळे या योजनेपासून शिक्षक, शिक्षकेतर वंचित राहू नये, लवकरच प्रस्ताव पाठवावे असे संस्थेस पत्र काढण्याची मागणी जुनी पेन्शन योजना कोअर कमिटीच्या वतीने करण्यात आली आहे.

# भिंगारमधून जाणाऱ्या कल्याण-विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्गावर 'दिशादर्शक, साईडपट्ट्या आणि रिफ्लेक्टर' त्वरित बसविण्यात यावेत



भिंगार मधून जाणाऱ्या कल्याण-विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्गावर दिशादर्शक व साईड पट्ट्या व उच्च परावर्तकता (रिफ्लेक्टर) बसवण्याची मागणी आमदार संग्राम जगताप यांच्या वतीने राष्ट्रीय महामार्ग कार्यालयाकडे करताना अमित खामकर आदी.

नगर - अपघात टाळण्यासाठी भिंगार मधून जाणाऱ्या कल्याण-विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्गावर दिशादर्शक व साईड पट्ट्या व उच्च परावर्तकता (रिफ्लेक्टर) बसवण्याची मागणी आमदार संग्राम जगताप यांच्या वतीने राष्ट्रीय महामार्ग कार्यालयाकडे करण्यात आली आहे.

भिंगार राष्ट्रवादीच्या शिष्टमंडळाने राष्ट्रवादी ओबीसी विभागाचे शहर जिल्हाध्यक्ष अमित खामकर यांच्या नेतृत्वाखाली रेल्वे स्टेशन रोड येथील राष्ट्रीय महामार्ग कार्यालयात उपविभागीय अभियंता अजित गायके व सहकारी इनामदार मॅडम यांची भेट घेऊन सदर प्रश्नांचे निवेदन दिले. यावेळी भिंगार युवक अध्यक्ष शिवम भंडारी, उपाध्यक्ष सागर चवंडके, कार्याध्यक्ष अभिजीत सपकाळ, संपत (तात्या) बेरड, मतीन ठाकरे, अजिंक्य भिंगारदिवे, दीपक लिपाने, भिंगार राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष संजय सपकाळ, दिनेश लंगोटे, करन पाटील, गणेश शिंदे, रतनदीप दरवडे आदी उपस्थित होते.

कल्याण-विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६१ स्टेट बँक चौक ते चाँदबीबी महाल दरम्यान दिशादर्शक व साईड पट्ट्यांचे काम प्रलंबित आहे. तर महामार्गावर रिफ्लेक्टर बसविण्यात आलेले नाही. यामुळे दिवसा व रात्री अंधारात अनेक लहान-मोठे अपघात होत आहे. या दुरावस्थेमुळे अपघातांना आमंत्रण मिळत असून, नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. शालेय विद्यार्थी, महिला व ज्येष्ठ नागरिकांना जीव मुठीत धरुन रस्त्यावरुन मार्गक्रमण करावे लागत आहे. या गंभीर प्रश्नाची तात्काळ दखल घेऊन कल्याण-विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्गावर दिशादर्शक व साईड पट्ट्या व उच्च परावर्तकता (रिफ्लेक्टर) बसवण्याची मागणी आमदार संग्राम जगताप यांच्या वतीने राष्ट्रवादीच्या शिष्टमंडळाने केली आहे.

राष्ट्रीय महामार्ग कार्यालयाने कल्याण-विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्गावर दिशादर्शक व साईड पट्ट्या व उच्च परावर्तकता (रिफ्लेक्टर) नसल्याने एखाद्याचे जीव जाण्याची वाट पाहू नये. तात्काळ या प्रश्नाची दखल घेऊन सदर काम मार्गी लावावे. या रस्त्यावर भिंगार, वडारवाडी, नागरदेवळे,आलमगीर जवळील गावांना जोडणाऱ्या नागरिकांची नेहमीच वर्दळ असते. नागरिकांच्या जीवाचा विचार करुन हा प्रश्न तात्काळ मार्गी लावावा, अशी मागणी अमित खामकर यांनी केली आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### केसांच्या सर्व समस्या करा दूर

महिलांना सुंदर आणि जाड केस हवेच असतात. शरीरातील पोषण तत्त्वांचा अभाव केसांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम करतो. केसांच्या मजबुतीसाठी आवळा, शिकेकाई, रीठा आणि भृंगराज यांची पावडर बनवा. लोखंडी पॅनमध्ये पाण्यासोबत शिजवून पेस्ट बनवा. ही पेस्ट केसांना लावा आणि काही वेळाने शॅम्पूशिवाय धुवा. ही पद्धत वापरुन केसांच्या सर्व समस्यांपासून कायमस्वरुपी मुक्तता मिळेल.

## पाककला

### तेल मसाला पोहे

**साहित्य :** पातळ पोहे २ वाट्या, १ मध्यम बारीक चिरलेला कांदा, १ मध्यम बारीक चिरलेला टोमॅटो, कोथिंबीर बारीक चिरुन, अर्धा वाटी दाण्याचे कुट, २ पळ्या तेल, चवीनुसार लाल तिखट, गोडा मसाला, मीठ

**कृती :** वरील सर्व साहित्य एका मोठ्या बाउलमध्ये घ्यावे, व हाताने एकजीव करावे. १५ मिनटात झटपट नाष्टा मधल्या वेळेत खाण्यासाठी तय्यार होईल.

## सौंदर्य

### स्किन ग्लो साठी

नारळाच्या तेलात अँटीऑक्सिडंट, अँटीफंगल आणि अँटीबॅक्टेरियल गुणधर्म आहेत जे त्वचेला पोषण आणि हायड्रेट करण्यास मदत करतात. आपण नारळाच्या तेलात बेसन, दही आणि हळद मिसळून चेहऱ्यावर ॲप्लाय करू शकता. याने त्वचेवर ग्लो वाढतो. आयुर्वेदात नारळाच्या तेलाला स्नेहन म्हणून ओळखले जाते.

## वास्तू

* टिव्ही, संगणक यासारखे इलेक्ट्रॉनिक्स् उपकरणे बेडरुममध्ये ठेवू नयेत.

* बेडरुममध्ये एक्वेरियम किंवा वॉटर प्लांट ठेवू नये.

## सल्ला

भाज्या चिरल्यानंतर धुवू नयेत. तसे केल्यास त्यातील पोषक घटक निघून जातात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. ४ एप्रिल २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, चैत्र शुक्लपक्ष, आर्द्रा २१।२१, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ४२ मि.**

## राशिभविष्य

**मेष :** अनुकूल ते सहकार्य मिळेल. वेळेचे सदुपयोग केल्याने लाभ मिळेल. कौटुंबिक वेळ अनुकूल राहील. अवाजवी खर्च होईल.

**वृषभ :** कामात व्यस्तता अधिक असल्यामुळे आरोग्यावर विपरीत प्रभाव पडू शकतो. महिलांना चिरणे, कापणे असे छोटे मोठे अपघात होतील.

**मिथुन :** आपल्या कामांमध्ये मित्रांचा सहयोग मिळेल. हितशत्रू डोके वर काढतील. व्यापार-व्यवसायात देवाण-घेवाण तोट्याची ठरेल.

**कर्क :** व्यवहारांमध्ये सावधगिरी न बाळगल्याने नुकसान संभवते. कोणतेही कार्य सहजरित्या होणार नाही. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**कन्या :** प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी आपल्या मित्रांचा व आपल्या कौटुंबिक सभासदांचा सहयोग लाभाचा ठरणार आहे. परदेशागमनाचे योग आहेत.

**सिंह :** भाऊबंद डोके वर काढतील. व्यापार-व्यवसायात देवाण-घेवाणीत लाभ होईल. वाहने व उपकरणे निकामी होण्याची शक्यता आहे.

**तूळ :** आज सर्व कार्ये सुरळीत पार पडतील. मुले त्रास देऊ शकतात. मूलभूत गरजांवर काम कराल. मागील उधारी वसुल होईल.

**वृश्चिक :** आपल्या व्यवहारांमध्ये सावधगिरी बाळगाल. आजचा दिवस छान जाईल. जुन्या शारिरीक व्याधींपासून मुक्तता मिळेल.

**धनु :** आरोग्य नरम-गरम राहील. नोकरदार मंडळींचे कामात लक्ष लागणार नाही. घरातील ताणतणावामुळे तुम्ही चिडचिड कराल.

**मकर :** प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी आपल्या मित्रांचा व आपल्या कौटुंबिक सभासदांचा सहयोग घ्याल. करार वा हमीस दिवस चांगला मात्र अंदाज चुकतील.

**कुंभ :** कामात हलगर्जीपणा झाल्यामुळे वरिष्ठांचा ओरडा ऐकावा लागेल. घरातील कलह तुमच्यावरील तणाव वाढवू शकतो

**मीन :** आवडत्या व्यक्तींसोबत वेळ व्यतीत कराल. घोळ निस्तरतील. भावनिक आनंद मिळेल. शारीरिक आरोग्य संतुलित राहिल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

राम : मी साबणाने माझा शर्ट धुतला पण आता तो मला छोटा होत आहे
श्याम : तु पण त्याच साबणाने आंघोळ कर मग तुला तो शर्ट फिट बसेल

---

गर्लफ्रेंड : 'तू जहाँ-जहाँ चलेगा मेरा साया साथ होगा
बॉयफ्रेंड : मला आधीपासूनच वाटत होते की तू चेटकीन असणार

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या दहशतवाद विरोधी समितीचे अध्यक्षपद कोणाकडे देण्यात आले आहे? - भारत

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## फिल्मीचक्कर क्र. ११८३ सौ. शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | २ | | | | ३ |
| | ■ | ■ | ■ | | ■ | ■ | |
| ४ | | | ५ | ■ | ६ | ■ | ■ |
| | ■ | ■ | ७ | | | | |
| ■ | ■ | ८ | | ■ | | ■ | ■ |
| ९ | ■ | | ■ | १० | ■ | ■ | ११ |
| १२ | | | ■ | १३ | | १४ | |
| ■ | ■ | १५ | | | ■ | | ■ |

**आडवे शब्द :-** १) मनोजकुमार, माला सिन्हा यांचा एक चित्रपट ४) ++++ की कसम (चित्रपटाचे नाव) ७) शम्मी कपूर, झीनत अमान, संजीवकुमार, देवकुमार यांचा एक चित्रपट ८) विनोद ++ (अभिनेता) १२) पत्थर और +++ (चित्रपटाचे नाव) १३) शाहरूख खान, जुही चावला, आदित्य पांचोली, अशोक सराफ यांचा एक चित्रपट १५) श्रीदेवी, व्यंकटेश, परेश रावल, रामी रेड्डी, जॅक गॉड आदींचा चित्रपट

**उभे शब्द :-** १) शत्रुघ्न सिन्हा, रिना रॉय, डॅनी, अजित यांचा एक चित्रपट २) जुन्या काळातील एक अभिनेत्री ३) ++ हमदम मेरे दोस्त (चित्रपटाचे नाव) ५) विश्वजीत, माला सिन्हा यांचा एक चित्रपट ६) मोसंबी +++ सुषमा शिरोमणीचा एक मराठी चित्रपट ८) हाल कैसा है जनाब का क्या +++ + आप का (गाण्याचे बोल) ९) ++ कहते है बडा नाम करेगा (गाण्याचे बोल) १०) बावरे +++ (चित्रपटाचे नाव) ११) ++ यही अपराध मैं हर बार करता हूं (गाण्याचे बोल) १४) ऋषी कपूर, डिंपल कापडिया यांचा एक गाजलेला चित्रपट

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : किंमत पाण्याची नाही तर तहानेची असते, किंमत मरणाची नसते तर श्वासाची असते.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### डोळ्यांची पापणी का फडफडते?

अती स्क्रीन वापर, कमी झोप किंवा वाचनामुळे डोळ्यांवर ताण येवून डोळ्यांचे त्रास सुरू होतात. मेडिकल कारण जाणून घ्यायचे झाल्यास मांसपेशी-स्नायूंमध्ये काही प्रॉब्लेम असल्यास त्यामुळे डोळ्याच्या पापण्या फडफडतात. तसेच माणसाला पुरेशी झोप न मिळाल्यास, मनात थोडा ताण असताना, जास्त थकवा येतो तेव्हा किंवा आपण लॅपटॉप-कॉम्प्युटरवर बराच वेळ काम केल्यानंतर डोळ्याच्या पापण्या फडफडू शकतात. मांस पेशींना नियंत्रित करणाऱ्या नसांचे नुकसान किंवा त्यांचे नियंत्रण कमी झाल्यास पापण्या सतत फडफडू शकतात आणि हा एका आजार आहे आणि त्यासाठी वैद्यकीय उपचार आवश्यक असतात.

आता पापणी फडफडणे शुभ की अशुभ आहे हे ज्याच्या त्याच्या मानण्यावर आहे. पण वैद्यकीय शास्त्रानुसार कधीतरी पापण्या फडफडणे हे सामान्य आहे. डोळ्याची पापणी रोज आपण जवळपास १० ते १५ सेकंदाला लवतो. ते आपणास कळत सुद्धा नाही.

याचे मूळ कार्य असे आहे की lacrimal ग्रंथीचे अश्रू डोळ्याच्या वरच्या बाजुवरील पापणी पूर्ण डोळ्यावर अश्रूंचा बारीक layer तयार करून, डोक्यात जाणारी घाण, धूळ, जंतू इत्यादी काढून टाकते तर कधी कधी आपल्या atonomous nervous सिस्टीम ला वाटते की डोळ्यात काहीतरी गेलेले आहे. यामुळे डोळ्याची उघडझाप जास्त होते आणि अश्रू बाहेर येतात. यालाच आपण पापणी फडफडणे असे म्हणतो. आपल्या शरीरातील अतिशय संवेदनशील अवयव डोळे असून त्याला प्रकाशाची जाणीव होते. डोळा हा खूप महत्वाचा अवयव आहे, कारण डोळे नसले तर आपण काहीच पाहु शकणार नाही व त्याचे अनुभव सुध्दा घेऊ शकत नाही. तसेच डोळे हे खूप नाजूक असतात. त्यांची काळजी घेणे आवश्यक असते.

यामध्ये बऱ्याचदा फक्त डोळ्याच्या वरचीच पापणी फडफडते. अचानक जाणवणारा हा त्रास थोड्या वेळात आपोआप कमी होतो. मात्र हा त्रास महीना पर्यंत जाणवत असल्यास हा एक आजार असू शकतो या आजाराला मायक्योमिया असे म्हणतात. डोळ्यांच्या पापण्यांमधील स्नायूंच्या आकुंचनामुळे हा त्रास जाणवतो.

## दुःखाचे कारण

एका माणसाच्या घरी टोपलीत काही कोंबड्या ठेवल्या होत्या. त्यातील एक अगदीच लठ्ठ व एक अगदीच बारीक होती. ती लठ्ठ कोंबडी बारीक कोंबडीची नेहमी चेष्टा करून हिणवीत असे.

एकदा त्या माणसाकडे मेजवानी होती. तेव्हा त्याने नोकराला सांगितले की,

'ह्या कोंबड्यात जी लठ्ठ कोंबडी असेल तिला मारून तिची कढी करा.' त्याप्रमाणे नोकर जेव्हा त्या लठ्ठ कोंबडीला मारू लागला तेव्हा ती आपल्याच मनाशी म्हणाली,

'मी जर त्या दुसऱ्या कोंबडीसारखी बारीक असते, तर आज माझ्यावर हा प्रसंग नक्कीच आला नसता.'

तात्पर्य - ज्या गोष्टीमुळे माणसाला गर्व येतो तीच गोष्ट दुःखाला पण कारणीभूत होऊ शकते हे विसरू नये.

## रहमते दर्शन (भाग - १)



८-१० रोज़ के बाद जब भाई को परम संत कृपालसिंह जी के पास दिल्ली लाये तो महाराज जी ने बहुत प्यार किया, पीठ थपथपाई और कहा कि भजन मत करना। एक दवाई बताई कि फिटकरी भूनकर, उसे पीस कर दूध में डाल कर पीना, सब ठीक हो जायेगा। भाई ने बताया कि उस घटना में उसके साथ बाबा सावनसिंह जी महाराज और परम संत कृपालसिंह साथ-साथ रहते थे। इस तरह की घटना दयाल पुरुष संत दर्शनसिंह के समय में भी ६ फ़रवरी के भंडारे के समय घटी थी। जैसे ही उसका दिमाग़ कुछ चला सा हुआ था, तो परिवार के लोग उसे ५ फ़रवरी को कृपाल आश्रम में ले आये। शाम को भाई कृपाल आश्रम से सावन आश्रम में गये, वहाँ जाकर एक तरंग उठी और सारे कपड़े उतार कर शक्ति नगर की तरफ भाग गये और रात को रामलीला ग्राउंड पहुँच गये। हमारे परिवार वालों ने दयाल पुरुष श्री

### उनका अपनापन

दर्शनसिंह जी से अर्ज़ की कि भाई का दिमाग चल गया है और कपड़े उतार कर सावन आश्रम से नंगा भाग गया है। सर्दी का मौसम था। परिवार वालों ने बहुत घबराकर अर्ज की थी। महाराज जी ने कहा कि कहीं ढूँढों, मिल जायेगा, चिंता मत करो। अगले दिन ६ फ़रवरी को एक रज़ाई ओढ़ कर भाई कृपाल आश्रम में आ गया। हमने पूछा कि यह रज़ाई कहाँ से लाया तो बताया कि महाराज दर्शनसिंह जी उसे रात को रामलीला ग्राउंड में देकर आये थे। यह बात सुनकर हमें विश्वास नहीं आया। हमने सोचा कि कोई और आदमी रज़ाई दे गया होगा। लेकिन सचाई ७ फ़रवरी को खुली जब भाई गुरु की कृपा से सही हालत में आ गया। और उस रज़ाई को लेकर घर के लिए चला तो बाहर गेट पर सेवादारों ने उस रज़ाई को देखकर रोक लिया और कहा कि यह रज़ाई आश्रम की है, कहाँ ले जा रहे हो। रज़ाई पर आश्रम का नम्बर भी पड़ा हुआ था। भाई ने बताया कि जब वह रात को राम लीला ग्राउंड में बैठा था, उसे पहले संत दर्शनसिंह जी महाराज स्कूटर पर दिखाई दिये। श्री राजिन्दर सिंह जी स्कूटर चला रहे थे और दयाल पुरुष दर्शनसिंह जी उनके पीछे बैठे थे। दयाल पुरुष उसे रज़ाई उढ़ाकर चले गये। सुबह हुई तो उस रज़ाई को भाई ओढ़ कर घूमता-घामता कृपाल आश्रम में दोपहर को पहुँच गया। यह बात बताने के बाद भाई ने कहा कि रजाई तो वह दे देगा, लेकिन दयाल पुरुष के सामने ही रज़ाई देगा, जिन्होंने उसे यह रज़ाई रामलीला ग्राउंड में पहुँचाई थी। सेवादारों ने सोचा कि महाराज जी तो आज बहुत व्यस्त हैं। एक बुजुर्ग सेवादार ने कहा, अरे छोड़ो इसे, यह कोई मस्त है, ले जाने दो रज़ाई को । भाई रज़ाई को लेकर घर आ गये। गुरु की कृपा को कौन समझ सकता है कि राम लीला ग्राउंड में भी गुरु रज़ाई पहुँचा सकता है।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

को प्रकाश समझ कर याद करना या सूक्ष्म लोक में मन को लगाये रखना। इस तरह याद करने के पीछे एक नियम काम करता है।

जब हम अपने को आत्मा समझते हैं तो पृथ्वी की चुम्बकीय शक्ति खत्म हो जाती है और वह आत्मा वा सूक्ष्म शरीर को खींच नहीं सकती जिस से हम विकारों से मुक्त हो जाते हैं। इसे हम ऐसे कह सकते हैं जैसे ही हम अपने को आत्मा समझते हैं। हम ५ किलोमीटर प्रति सेकेंड की गति से आन्तरिक रुप से भागने लगते हैं और परमात्म की ओर बढ़ते हैं। इस गति से चलने से चुम्बक के प्रभाव अर्थात विकारों के प्रभाव से मुक्त हो जाते हैं।

जब हम परमात्मा को बिंदू समझ कर याद करते हैं तब भी हमारा सूक्ष्म शरीर ५ किलोमीटर की गति से दौड़ने लगता है और हम ५ विकारों के चुम्बक से छूट जाते हैं। अगर हम सूक्ष्म वतन वा परमधाम में मन लगाते हैं तब भी हमारा सूक्ष्म शरीर ५ किलोमीटर प्रति सेकेंड की गति से चलने लगता है जिस से हम धरती अर्थात देह वा विकारों के चुम्बक से बच जाते हैं।

अगर कोई व्यक्ति जो ज्ञान नहीं जानता वह अपनी बुद्धि को नीले आकाश में लगाये रखे तो उस पर भी यह नियम काम करेगा उसके शरीर की गति

### मूल आधार चक्र

५ किलोमीटर हो जायेगी और वह भी विकारों के चुम्बक से बच जायेगा ।

सूक्ष्म मूल आधार चक्र - १५

मां का पेट बच्चे के लिये जरूरी पोषण प्रदान करता है। बच्चे को सिर्फ और सिर्फ एक ही सहारा होता है मां का पेट । वृक्ष की पत्तियों और टहनियों को शक्ति जड़ से मिलती है। सभी जीव जन्तु व मनुष्य भोजन के रुप में शक्ति पेट से प्राप्त करते हैं, जिस से शरीर हृष्ट पुष्ट बनता है। ऐसे ही मनुष्य के भौतिक विकास, आध्यात्मिक विकास व संसारिक विकास की नींव है मूल आधार चक्र । इस चक्र का संबन्ध अवचेतन मन से भी है जिसमें पिछले जन्मों के कर्म और अनुभव संग्रहीत हैं। जहां से मनुष्य को हर समय अच्छी वा बुरी प्रेरणाएं मिलती रहती हैं। इन्ही प्रेरणाओं अनुसार मनुष्य कर्म करता है।

यह चक्र दोनो नथुनों से भी जुड़ा है जहां से वह सांस के द्वारा उर्जा प्राप्त करता है। बायें नाक से ऋणात्मक तथा दायें नाक से धनात्मक उर्जा प्राप्त करता है। यह चक्र सहस्त्रार केन्द्र से भी जुड़ा हुआ है जहां से वह भगवान से शक्ति प्राप्त करता है। यह केन्द्र धरती से भी जुड़ा हुआ है। इस लिये जो कुछ भी हम खाते हैं उसका सूक्ष्म रुप में अच्छा व बुरा प्रभाव इस चक्र पर जरूर होता है।

यह चक्र जब ठीक होता है तो मनुष्य में स्फूर्ति और उत्साह बढ़ जाता है और विकास कार्यों में लगा रहता है। व्यक्ति निर्भीक हो जाता है। उसके अन्दर वीरता की भावना उत्पन्न हो जाती है। आनंद का भाव बना रहता है। सहानुभूति, विश्वास, निष्ठा और संतुलित व्यक्तित्व बन जाता है।

इस चक्र पर जब नकारात्मकता का प्रभाव होता है तो सुस्ती, निष्क्रियता, स्वार्थ भावना बढ़ जाती है तथा अपनी शारीरिक इच्छाओं की पूर्ति और तृष्णाओं से पीड़ित रहता है। कुछ करने की उत्सुकता नहीं रहती, अव्यवस्थित रहने लगता हैं। स्वाभिमान में कमी आ जाती है। दिशा हीन हो जाता हैं। लक्ष्य तय नहीं कर पाता। काम धंधा बार बार बदलता रहेगा।

मूल आधार चक्र और पवित्रता

मूल आधार चक्र धरती से जुड़ा हुआ है। इस चक्र का जागरण ही विश्व को जीतना है। इस चक्र का जागरण ही कुंडलनी जागरण है। इस चक्र को जीतने के लिये ब्रह्मचर्य पहली शर्त है।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदीय बालसंस्कार

परंतु हे स्वप्न काही दिवसांतच भंग पावले. एकीकडे कौटुंबिक जबाबदारी तर दुसरीकडे वैद्यकीय क्षेत्रामध्ये शून्यातून विश्व निर्माण करून त्यामध्ये जम बसविण्यासाठी दिवसातील बराचसा वेळ काम करण्यातच जात असे. रुग्णांना चांगली सेवा देता यावी म्हणून अहोरात्र काम करीत होते. मी स्वतः गर्भवती आहे, एका बाळाची आई होणार आहे; तर अशा अवस्थेत विश्रांती, खाणे-पिणे याची काळजी घ्यायला हवी, याचा काम करीत असताना विसर पडत असे. अशातच आठव्या महिन्याच्या पहिल्या आठवड्यातच मला अचानक अति रक्तस्राव (Anti Partum Haemarrhage) सुरू झाला.

हॉस्पिटलमध्ये डमिट करेपर्यंत शरीरात फक्त ३० टक्के रक्त राहिले होते. रक्ताच्या तीन पिशव्या भरल्या, तरीही व औषधोपचार करूनही रक्तस्राव थांबत नसल्यामुळे मला वाचविण्यासाठी सीझेरियन करण्याचा निर्णय डॉक्टरांनी घेतला. बाळ वाचण्याची शक्यता सांगितलीच नव्हती. सीझेरियन झाल्यानंतर बाळाचे वजन फक्त १,२०० ग्रॅम एवढे भरले. अपुऱ्या दिवसांमुळे बाळाला श्वासोच्छ्वास घेण्यास त्रास होत होता म्हणून बाळाला- दुर्वाला- कृत्रिम (Ventilater)

### अपुऱ्या दिवसांचे व कमी वजनाचे बाळ

श्वासोच्छ्वासावर ठेवण्याची गरज लागू शकत होती, म्हणून तिला पुण्यातील एका हॉस्पिटलमध्ये तत्काळ नगरहून न्यावे लागले. या काळात गर्भ गर्भाशयात स्थिर झालेला असतो. भावी मातेच्या शरीराला गर्भाची सवय झालेली असते; त्यामुळे या काळात उलटी, मळमळ होण्याचा त्रास कमी झालेला, अता गर्भवतीची भूक देखील वाढलेली असते; कारण गर्भ पूर्णपणे मातेच्या आहारावर अवलंबून असतो. त्याकरिता मातेने सकस, ताजे, घरी बनविलेले शुद्ध, सात्त्विक असे अन्न घ्यावे. बाहेरचे रस्त्यावरचे, हॉटेलमधील पावभाजी, पाणीपुरी, शेवपुरी यांसारखे पदार्थ खाऊ नयेत, कारण पदार्थांसाठी वापरलेले पाणी अशुद्ध असते व तेल देखील चांगल्या प्रतीचे नसते. तसेच वापरलेला भाजीपाला धुतलेला नसतो. प्लेट्स, चमचे इ. अस्वच्छ असतात; त्यामुळे जंतुसंसर्ग होऊन गॅस्ट्रो, ताप असे आजार उद्भवू शकतात. त्याकरिता काही वेगळे खाण्याची इच्छा झाल्यास घरात किंवा नातेवाईकांकडे, मैत्रिणींकडे तो पदार्थ करून खावा. या तीन महिन्यांत गर्भात आकार वाढल्यामुळे त्याचा आतड्यावर ताण पडतो; त्यामुळे मलावस्तंभ, अपचन असे आजार गर्भवतीला होऊ शकतात; म्हणून रोजच्या जेवणात गायीचे तूप, दूध, पालेभाज्या, फळभाज्या - उदा. भोपळा, कोहळा, पडवळ, दोडके, घोसाळे, सिझनेबल फळे यांचा भरपूर वापर करावा. गव्हाच्या पीठाचा न चाळताच पोळ्यांसाठी वापर करावा. रक्तदाब नॉर्मल राहावा याकरिता अति मसाल्याचे पदार्थ, पापड, लोणची टाळावी. आपल्याकडे गर्भवतीने खाण्याच्या पदार्थांबद्दल काही गैरसमज आहेत. उदा. केळी, पपई, आंबा, अननस व भाज्यांमध्ये मेथी व कडधान्यामध्ये हुलगे खाल्ल्यास गर्भपात होतो. त्याकरिता हे पदार्थ खाऊ नयेत. हे काही अंशी बरोबर आहे; परंतु अतिप्रमाणात हे पदार्थ खाण्यात आले तरच त्रास उद्भवू शकतो. आंबा, पपई, अननस यांची एखादी फोड खाल्ल्यानंतर काही त्रास होत नाही.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००




लायन्स क्लब व लिओ क्लब यांच्या संयुक्त विद्यमानाने सावेडी येथील केशवराव गाडीलकर हायस्कूलमध्ये आयोजित शिबीरामध्ये लायन्स क्लबचे अध्यक्ष डॉ. अनघा पारगावकर, लिओ क्लबचे अध्यक्ष रिधिमा गुंदेचा, सचिव डॉ. सिमरन वधवा आदी. शेजारील छायाचित्रात स्वसंरक्षण विषयक सराव करताना विद्यार्थिनी दिसत आहेत.

# मुलींसाठी स्वसंरक्षण ही काळाची गरज

**डॉ. अनघा पारगावकर यांचे प्रतिपादन**

नगर – मुलींसाठी स्वसंरक्षण ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन डॉ. अनघा पारगावकर यांनी केले.

लायन्स क्लब व लिओ क्लब यांच्या संयुक्त विद्यमानाने सावेडी येथील केशवराव गाडीलकर हायस्कूलमध्ये इयत्ता सातवी ते नववीच्या विद्यार्थिनींसाठी स्वसंरक्षण करण्यासाठी तीस दिवसांचे शिबिर घेण्यात आले. यामध्ये विद्यार्थिनींना स्वतःचे रक्षण करता यावे यासाठी कराटे, काठी आणि स्वतः हाताने बचाव कसा करता येईल यावर प्रशिक्षण देण्यात आले. त्यासाठी गेल्या अनेक वर्षापासून शहर स्तरावर प्रशिक्षण देणाऱ्या कराटे प्रशिक्षिका सौ. सोनाली साबळे यांनी तयारी करून घेतली. त्याची सांगता २ एप्रिल रोजी विद्यालयात झाली. त्याप्रसंगी लायन्स क्लबचे अध्यक्ष डॉ. अनघा पारगावकर, लिओ क्लबचे अध्यक्ष रिधिमा गुंदेचा, सचिव डॉ. सिमरन वधवा, अरविंद पारगावकर, हरजीतसिंग वधवा, दिलीप कुलकर्णी, डॉ.मुनोत, कुस्तीपटू अंजली देवकर हे उपस्थित होते.

लायन्स क्लबने स्तुत्य उपक्रम राबवून विद्यार्थिनींना निर्भय व स्वतःचे संरक्षण करण्यासाठी सक्षम बनविले असे अरविंद पारगावकर म्हणाले.

लायन्स क्लबच्या माध्यमातून आजतागायत विद्यालयाला शैक्षणिक साहित्य वाटप व इतर प्रकारे मदत करण्यात आली आहे.

शाळेतील वृक्षवल्ली व विविध उपक्रम याविषयी संस्थेचे व विद्यालयाचे डॉ. सिमरन वधवा यांनी कौतुक केले.

क्लबच्या प्रेसिडेंट रिधिमा गुंदेचा हिने विद्यार्थ्यांना पुढील करिअर साठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांना न घाबरता अन्यायाला प्रतिकार करावा, असे त्या पुढे म्हणाल्या.

महिनाभर विद्यालयाने व विद्यार्थिनींनी केलेले सहकार्य याविषयी प्रशिक्षिका सोनाली साबळे यांनी कौतुक केले.

विद्यार्थ्यांनीही गेल्या महिनाभरात खूप गोष्टी शिकावयास मिळाल्या व यापुढे निश्चित अन्याय सहन न करता त्याविरुद्ध प्रतिकार करू असेही सांगितले. महिनाभर घेतलेल्या प्रशिक्षणा मधील अनेक प्रात्यक्षिके पाहुण्यांसमोर करून दाखविले. त्याचे कौतुक करण्यात आले.

सांगता कार्यक्रमात पाहुण्यांचा पुष्पगुच्छ देऊन मुख्याध्यापक अनिल गायकवाड यांनी सत्कार केला.

सूत्रसंचालन सौ. जयश्री देशपांडे यांनी केले. शिक्षिका सौ. मनीषा बोर्डे यांनी पाहुण्यांचे नावे मोडी लिपीत लिहून त्यांना ती भेट दिली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी चंद्रकांत डाके, मिरा सोनकांबळे यांनी सहकार्य केले. बाबासाहेब शिंदे यांनी आभार मानले.

'करिअर कट्टा' या उपक्रमांतर्गत आयोजित

# पुणे विभागीय स्तरावरील स्पर्धेत अहमदनगर महाविद्यालयास प्रथम क्रमांकाचा पुरस्कार

नगर – महाराष्ट्र राज्य उच्च तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र व पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, निगडी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने 'करिअर कट्टा' या उपक्रमांतर्गत आयोजित पुणे विभागीय स्तरावरील स्पर्धेमध्ये अहमदनगर महाविद्यालयास जिल्हास्तरीय प्रथम क्रमाकांचा पुरस्कार प्राप्त झाला आहे.



'करिअर कट्टा' उपक्रमांतर्गत आयोजित पुणे विभागीय स्तरावरील स्पर्धेत अहमदनगर महाविद्यालयास प्रथम क्रमांकाचा पुरस्कार स्वीकारताना उपप्राचार्य डॉ. प्रितमकुमार बेदरकर आणि समन्वयक डॉ भागवत परकाळ आदी.

तसेच अहिल्यानगर उत्कृष्ट जिल्हास्तरीय तालुका समन्वयक म्हणून डॉ. भागवत परकाळ यांना द्वितीय पुरस्कार प्राप्त झाला. सदर पुरस्काराचे वितरण महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, महाराष्ट्र आर्थिक विकास महामंडळ क्षेत्रीय संचालक सचिन व ईटकर, पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या हस्ते झाले. महाविद्यालयाच्या वतीने दोनही पुरस्कार उपप्राचार्य डॉ. प्रितमकुमार बेदरकर आणि समन्वयक डॉ भागवत परकाळ यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

या कार्यासाठी बी.पी.एच.ई. सोसायटीचे अध्यक्ष डॉ. आर. जे. बार्नबस यांचे सहकार्य लाभले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. नोएल पारगे, उपप्राचार्य दिलीपकुमार भालसिंग, कायम विनाअनुदानित विभागाचे समन्वयक डॉ. सय्यद रज्जाक आणि रजिस्ट्रार पिटर चक्रनारायण यांनी कौतुक केले.

# प्रगत विद्यालयाचा आर्यन दिकोंडा एनएमएमएस परीक्षेत जिल्ह्यात दुसरा



नगर – सन २०२४ मध्ये महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षे मध्ये (N. M. M. S.) प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा इयत्ता आठवी मध्ये शिकणारा चिरंजीव दिकोंडा आर्यन गणेश या विद्यार्थ्यांचा एसबीसी या प्रवर्गामध्ये जिल्ह्यात दुसरा क्रमांक आला. यामध्ये विद्यालयामध्ये एकूण १३ विद्यार्थी सार्थी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये पात्र झालेली असून हा दिकोंडा विद्यार्थी गुणवत्ता यादीमध्ये आला.

त्याचे व सारथी शिष्यवृत्तीसाठी पात्र सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे तसेच त्याला मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षिका श्रीमती भोरे जयमाला यांचे दि प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्रीमती विजया रेखे, उपाध्यक्ष चंद्रशेखर पुरुषोत्तम कुलकर्णी, सेक्रेटरी किरण सुधाकर वैकर, प्रगत विद्यालयाचे चेअरमन व संस्थेचे खजिनदार उमेश चंद्रकांत रेखे, कार्यकारणी सदस्य महेश चंद्रकांत रेखे (गुरुजी), उदयकुमार अरुण भणगे,

ॲड. उमेश रंगनाथ नगरकर, संस्थेचे माजी अध्यक्ष दि. ना. जोशी, शालेय समितीचे सदस्य विठ्ठल यशवंत धिमते, सौ. कुलकर्णी शोभा, श्रीपाद मुरलीधर मुळे, विद्यालयाचे प्राचार्य सुनिल पंडित, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. खडके विद्या, सौ. बंड स्नेहल, सौ. भारदे वैशाली, उच्च माध्यमिक विभागाच्या प्राध्यापिका सौ. हर्षाली देशमुख, गाडगे सुनिल, रोकडे दिलीप, सौ. अनिता सरोदे, विजय गरड, ज्ञानदेव सुंबरे, सौ. सोनाली ठाकूर, प्रा. कराळे गौतम, प्रा. शेलार श्रीकांत, प्रा. गुंजाळ सचिन आदींनी अभिनंदन केले.

# शहरात बुथ कमिट्या सक्षम झाल्याने पक्ष संघटनेला बळकटी

**बाळासाहेब भुजबळ यांचे प्रतिपादन; प्रभाग १३ मध्ये बुथ कमिटीची बैठक**

नगर – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनेप्रमाणे तसेच प्रदेश महामंत्री विजय चौधरी व विभाग संघटन मंत्री रवी अनासपुरे यांनी अहिल्यानगर येथे येवून मार्गदर्शन केले. तसेच शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर यांच्या नेतृत्वाखाली अहिल्यानगर शहरात भाजपच्या वतीने बुथ कमिटीचे गठन करण्यात येत आहे. शहरात भाजपाला मोठा जनाधार आहे. शहर भाजपमय झाले आहे. बुथ कमिट्या सक्षम झाल्याने पक्ष संघटनेला बळकटी मिळाली आहे, असे प्रतिपादन प्रभाग क्रमांक १३ चे बुथचे अध्यक्ष तथा ओबीसी मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ यांनी केले आहे.



गौरी घुमट येथील प्रदेश सदस्य तथा निरीक्षक वसंत लोढा यांच्या निवासस्थानी प्रभाग १३ मध्ये बुथ कमिटीची बैठक पार पडली.

गौरी घुमट येथील प्रदेश सदस्य तथा निरीक्षक वसंत लोढा यांच्या निवासस्थानी प्रभाग १३ मध्ये बुथ कमिटीची बैठक पार पडली. यात बुथ कमिटीच्या अध्यक्षांची निवड पुढील प्रमाणे करण्यात आली. बुथ क्र.८७ चे अध्यक्ष वसंत लोढा– सुचक सागर शिंदे, बुथ क्र.१८६ चे अध्यक्ष सुरज नामदे– सूचक विजय मुत्याल, बुथ क्र.१९८चे अध्यक्ष उज्वला भांगे– सूचक ज्ञानेश्वर भांगे, बुथ क्रमांक २०३ चे अध्यक्ष बाळासाहेब भुजबळ–सुचक अजय भुजबळ, बुथ क्रमांक २०४ चे अध्यक्ष भानुदास बनकर –सुचक अश्विनी रासने यांच्या सह लाभार्थी प्रमुख, मन की बात प्रमुख, व्हॉट्सअप प्रमुख यांची निवड करण्यात आली. यावेळी माजी नगराध्यक्षा सौ. लता लोढा, वर्षा ढवळे, आरती आढाव, बाळासाहेब खाडे, सचिन पळशीकर, ज्ञानेश्वर धिरडे, सुनिता शिंदे, रमेश कदम, रोहित दसरे, दिलीप सुपेकर, हेमंत मुळे, सचिन शिंदे, विनायक कोतवाल, मयूर गोडगे, छोटू आडेप आदी उपस्थित होते.

वसंत लोढा म्हणाले, भाजपने शहरात बुथ कमिट्या गठन केल्या आहेत. बुथ अध्यक्षांना विशेष अधिकार दिलेले आहेत. तसेच राज्य व केंद्र सरकारच्या योजना पोचविण्यासाठी बूथ कमिटी महत्त्वाची भुमिका बजावणार आहे. येणाऱ्या महापालिकेच्या निवडणुकीत बुथ कमिटी सक्षमपणे काम करतील. व भाजपला यश मिळवून देतील. भविष्यकाळात भारतीय जनता पार्टी हा शहरातील मोठा पक्ष असेल. यावेळी आभार सागर शिंदे यांनी मानले.

# 'अनाथांचे नाथ' होऊन स्व.पाऊलबुधे यांनी शैक्षणिक क्षेत्रात बहुमोल योगदान दिले

**राजेंद्र कटारिया यांचे प्रतिपादन**

नगर – शेतकरी कुटुंबातील सर्वसामान्य व्यक्तींमत्व असलेले स्व.डॉ.नाथ पाऊलबुद्धे यांनी सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात आपल्या कर्तुत्वाने बुद्धिमत्तेच्या जोरावर एका विशिष्ट ध्येयाने प्रेरित होऊन गोरगरीब, वंचित घटकांसाठी काम करून नावातच नाथ असल्याने अनाथांचे नाथ होऊन विडी कामगार, औद्योगिक कामगारांच्या मुलांना शिक्षण मिळवून देण्यासाठी सेवा शिक्षण प्रसारक मंडळ स्थापन करून शैक्षणिक क्षेत्रात बहुमोल योगदान दिले, असे प्रतिपादन उद्योजक राजेंद्र कटारिया यांनी केले.

वसंतटेकडी येथील डॉ.ना.ज. पाऊलबुधे शैक्षणिक संकुलात संस्थापक स्व.ना.ज.पाऊलबुद्धे यांचा २१ वा स्मृतिदिन विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. प्रारंभी सर्व युनिटच्या वतीने त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली अर्पण वाहण्यात आली. याप्रसंगी उद्योजक राजेंद्र कटारिया, डॉ.मंदार कुलकर्णी, संस्थेचे सचिव रामकिसन देशमुख, दादासाहेब भोईटे, रघुनाथ कारमपुरी, डॉ. श्रद्धा पाऊलबुधे, साई पाऊलबुद्धे, डॉ. रेखा राणी खुराणा, प्राचार्य डॉ. श्याम पंगा, भरत बिडवे, संदीप कांबळे, बाळासाहेब बोर्डे, प्राचार्या अनुराधा चव्हाण, सविता सानप, डॉ.सुचित्रा डावरे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

प्रास्ताविकात सचिव रामकिसन देशमुख यांनी अण्णांच्या स्मृतीला उजाळा देताना म्हणाले स्मृतिदिन हा आठवणी सांगण्यासाठी असतो. त्यांच्या सहवासात काम करायला संधी मिळाली. आज २१ वर्षानंतरही त्यांच्या नावाने आमच्या संस्थेची कामे होतात ही अभिमानाची बाब आहे. त्यांच्या विषयी आजही समाजातील प्रतिष्ठित व्यक्तींना आदर आहे.



वसंत टेकडी येथे डॉ. नाथ पाऊलबुधे यांच्या स्मृतीदिन कार्यक्रमात बोलताना राजेंद्र कटारिया.

## डॉ.ना.ज.पाऊलबुधे स्मृतिदिन विविध उपक्रमांनी साजरा

डॉ. रेखाराणी खुराणा यांनी सांगितले की डॉ. नाथ साहेबांचा प्रत्येक काम करताना दूरदृष्टीकोन होता. प्राथमिक ते महाविद्यालयीन शिक्षणाबरोबरच तंत्रनिकेतन कॉलेज सह डी.फार्मसी, बी. फार्मसी, एम.कॉम. पर्यंत युनिट झाले. १४ युनिट, ४५०० विद्यार्थी, २०० ते २५० शिक्षक सध्या या संकुलात आहेत संस्थेचे अध्यक्ष विनय पाऊलबुधे देखील संस्थेच्या प्रगतीसाठी सदैव प्रयत्नशील असतात.

डॉ.मंदार कुलकर्णी यांनी सांगितले की अण्णांना गरिबांचे डॉक्टर म्हणून ओळखणारे आजही आहेत. व्यवसायात सेवाभावी वृत्ती त्यांनी ठेवली होती आमदारकीची २ वेळा संधी मिळाली त्याचा सदुपयोग केवळ शैक्षणिक क्षेत्रासाठी केला.आपली आमदारकी समाजाच्या प्रगतीसाठी पणाला लावली हा त्यांचा मोठेपणा दिसतो.

प्राचार्य भरत बिडवे म्हणाले की डॉ. पाऊलबुधे यांनी शैक्षणिक संकुलाचे हे छोट्या रोपाचे मोठ्या वटवृक्षात रूपांतर झाले. हे त्यांचे स्वप्न पूर्ण झाल्याने हा स्मृतिदिन कायम सर्वांच्या स्मरणात राहील.

दादासाहेब भोईटे यांनी आपल्या भाषणात सांगितले की पाऊलबुद्धे हे व्यवसायाने डॉक्टर की करीत पण गरिबांना त्या वैद्यकीय सेवेचा लाभ देत असत शैक्षणिक क्षेत्रात पद्मशाली समाजाच्या आर्थिक विकासासाठी प्रयत्न केला. गृहनिर्माण संस्था स्थापन करून घरे दिली त्यांच्या मुलांसाठी शिक्षणाची सोय केली तीच मुले आज राज्यात आपले नाव उंचावत असून शाळेचा देखील नावलौकिक वाढविला त्यांचा आनंद होतो.

डॉ.पाऊलबुधे स्मृतिदिनानिमित्त पॅनल डिस्कशन घेण्यात आले. ॲलोपॅथी आणि आयुर्वेदिक विषयावर व्याख्यान झाले. मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. यामध्ये नाडी परीक्षण, शुगर, बीपी तपासणी झाली. परिसरातील नागरिकांनी लाभ घेतला.

फार्मसी प्रश्नमंजुषा स्पर्धेत विविध कॉलेज मधील विद्यार्थ्यांनी भाग घेऊन रंगत आणली प्रथम क्रमांकाचे बक्षीस शिरूर येथील सीताबाई थिटे फार्मसी कॉलेजला मिळाले १२ th फेल हा चित्रपट विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला यामधून विद्यार्थ्यांनी कितीही कठीण परिस्थिती आली तरी हार न मानता आपण करिअर कसं घडवायचं हा संदेश दिला.या उपक्रमाचे संस्थेचे अध्यक्ष विनय पाऊलबुद्धे यांनी कौतुक केले.



श्री मैढ़ क्षत्रिय सोनार समाज, अहिल्यानगर यांचा गणगौर महोत्सव उत्साहात गंजबाजार येथे झाला.

# मैढ़ क्षत्रिय सोनार समाजाचा गणगौर महोत्सव उत्साहात

नगर – श्री मैढ़ क्षत्रिय सोनार समाज, अहिल्यानगर यांचा गणगौर महोत्सव उत्साहात गंजबाजार येथे झाला. हा उत्सवाचा १० दिवस रोज कार्यक्रम होता त्याची सांगता झाली. यावेळी श्रीकीसन मिरांडे, विजय सहदेव, ओमप्रकाश सहदेव, भरत जवडा, मदन मिरांडे, गोपाल खळबळ्या, चंद्रप्रकाश मिरांडे, लक्ष्मीनारायण खळबळया, संजय वर्मा, अशोक वर्मा, भरत सहदेव, शुभम मिरांडे, संतोष कडेल, हेमंत बेवाळ, अशोक मिरांडे, किशोर भोमा, कन्हैयालाल कडेल, रुपेश वर्मा, स्वप्निल धुप्पड, सुमित वर्मा व समाज बंधू भगिनी उपस्थित होत्या.

गणगौर महोत्सव म्हणजे शंकर पार्वती यांचा विवाह सोहळा. श्री मैढ़ क्षत्रिय सोनार समाज हा गेले ४५ वर्षा पासुन हा उत्सव नगरमध्ये करत आहे. या धार्मिक व सामाजिक सोहळ्याचे आयोजन श्री मैढ़ क्षत्रिय युवा मंचाचे अध्यक्ष गोपाल वर्मा यांनी व टीमने केले. दर वर्षी वधूपक्ष व वरपक्ष बदलत असुन या वर्षी वरपक्ष बजरंग काशिनाथ गुरव सराफ दालनाचे संचालक सागर संजय गुरव यांना व वधूपक्ष मुकेश लक्ष्मीनारायण खळबळया यांना हा मान मिळाला.

हा शंकर पार्वती विवाह सोहळा उत्साहात व जल्लोषात झाला. महिलांनी यावेळी परिसरातून मिरवणूक काढली. नंतर विवाह सोहळा झाला. महाप्रसाद, भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली

# गणगौर हा गृहिणींचा सन्मान करणारा उत्सव

**छायाताई फिरोदिया यांचे प्रतिपादन; शहरात लोडी समाजातर्फे विवाह सोहळा उत्साहात**

नगर – गृहिणीच्या रूपात असलेल्या गौरीचे स्मरण करत साजरा होणारा गण–गौर अर्थात शिव पार्वती विवाह सोहळा हा गृहिणीपणाचा, गृहिणींचा सन्मान करणारा उत्सव आहे, असे प्रतिपादन सहेली ग्रुपच्या श्रीमती छायाताई फिरोदिया यांनी केले.

शहरातील लोडी साजन समाजातर्फे केशरगुलाब मंगल कार्यालयात गणगौर अर्थात शिव पार्वती विवाह सोहळा पारंपरिक पद्धतीने उत्साहपूर्ण व भक्तिपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी त्या बोलत होत्या. जैन ओसवाल पंचायत सभा, जय आनंद महावीर युवक मंडळ व सहेली ग्रुपच्यावतीने या गण–गौर सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.



लोडी साजन समाजातर्फे केशरगुलाब मंगल कार्यालयात गणगौर अर्थात शिव पार्वती विवाह सोहळा पारंपरिक पद्धतीने उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

सौ.शुभदा निखिल फिरोदिया, सौ.भावना अभय गांधी, सौ.तन्वी सौरभ गांधी, सौ.चैताली वर्धमान पितळे या दाम्पत्यांच्या हस्ते गण–गौरची विधीवत पूजा करण्यात आली. यावेळी सहेली ग्रुपच्या श्रीमती आशाताई फिरोदिया, जैन ओसवाल पंचायत सभेचे सहसेक्रेटरी संतोष गांधी, बाळासाहेब भंडारी, जय आनंद महावीर युवक मंडळाचे सेक्रेटरी आनंद मुथा, सीए महेश भळगट, डॉ. विजय भंडारी, ॲड. विजय मुथा, रिंकू फिरोदिया, आशा ईश्वर मुनोत, साधना गांधी यांच्यासह शहराच्या विविध भागांमधील महिला उपस्थित होत्या.

गण–गौरची वरात सुनिल शांतीलाल मुनोत (नेवासकर) यांच्या केशरगुलाब कंपाऊंडमधील निवासस्थानापासून काढण्यात आली. येथे सौ. मंजुश्री मुनोत यांनी वरातीचे स्वागत केले. बँड पथक, पारंपारिक वेशभूषा केलेल्या व डोक्यावर शिवपार्वतीची मूर्ती घेतलेल्या महिला यात सहभागी झाल्या होत्या. राजस्थानी नृत्य सादर करत महिलांनी वरातीचा आनंद लुटला. केशर गुलाब मंगल कार्यालयात शिव पार्वती विवाह सोहळा झाला. पहिल्या दिवशी फळतीज पूजा भक्तिपूर्ण वातावरणात झाली. सौ.पुष्पा ललित बनभेरु यांनी सर्व पूजेची व्यवस्था पाहिली. वेदमूर्ती चकोर मुळे गुरुजी यांनी पूजाविधी केला.

गणगौर व्रत उत्तर भारतात गुढी पाडव्याच्या पर्वात साजरे केले जाते. या व्रताने पतीची कृपा आपल्यावर रहाते आणि कुमारिकांना चांगला पती मिळतो, अशी श्रध्दा आहे. याचदिवशी शंकराने पार्वतीला आणि पार्वतीने समस्त स्त्री जातीला सौभाग्य बहाल केले होते. सुवासिनी हे व्रत घेण्यापूर्वी गौरीची स्थापना करतात व त्यांचे पूजन करतात. त्यानंतर गौरीची कथा सांगितली जाते.

छायाताई फिरोदिया पुढे म्हणाल्या, राजस्थानी संस्कृतीत गणगौर उत्सवाला मोठी परंपरा आहे. नगरमध्येही गणगौर सारखा पारंपरिक सण दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा करून महिला पुढच्या पिढीपर्यंत ही परंपरा पोहचवण्याची कामगिरी श्रध्देने बजावत आहेत. यानिमित्त सर्वजणी एकत्र येवून एकमेकींशी संवाद साधून सणाचा आनंद लुटतात. यावर्षी चांगला उत्साह पहायला मिळाला.

संतोष गांधी म्हणाले, जैन ओसवाल पंचायत आणि जय आनंद महावीर युवक मंडळाने सण उत्सव एकत्रित साजरे करून महिलांना एकत्र आणण्याची परंपरा सुरू केली आहे.

आनंद मुथा म्हणाले, गण गौर विवाह सोहळ्यात महिला व युवती दरवर्षी आवर्जून सहभागी होतात. अशा उपक्रमांतूनच पूर्वापार चालत असलेल्या परंपरांचे जतन होते हे महत्वाचे आहे.

जैन ओसवाल पंचायत सभेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या मार्गदर्शनाखाली जैन ओसवाल पंचायत सभा, जय आनंद महावीर युवक महिला मंडळ व सहेली ग्रुपच्या सर्व सदस्यांनी या सोहळ्यासाठी अथक परिश्रम घेतले. या सोहळ्यामध्ये शहराच्या विविध भागामधील महिला सहभागी झाल्या होत्या. शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फौंडेशनचे व् केशर गुलाब मंगल कार्यालय उपलब्ध करून दिल्याबद्दल किशोर हस्तीमल मुनोत (नेवासकर) परिवाराचे आयोजकांच्यावतीने आभार मानण्यात आले.




तारकेश्वर गडाच्या नारळी सप्ताहात फुगडी खेळताना सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार व निरुपणकार गणेश शिंदे समवेत महंत आदिनाथ शास्त्री महाराज व उपस्थित वारकरी बांधव.

# संत ज्ञानेश्वर महाराजांचा जन्म सप्तशताब्दी सुवर्ण महोत्सव राज्यभर साजरा करणार : सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार

नगर – संत ज्ञानेश्वर महाराजांचे आपल्यावर नितांत उपकार आहेत. सर्व सामान्य माणसाला ज्ञानाची कवाडे खुली करून दिली. त्यांनी तत्कालीन व्यवस्थेविरुद्ध बंड पुकारले परंतु ते बंड सर्व सामान्य माणसांसाठी त्यांच्या कल्याणासाठी होते. विश्वाच्या कल्याणाची प्रार्थना करणाऱ्या ज्ञानेश्वर महाराजांचे हे ७५० वे जन्म वर्ष आहे, ते मोठ्या दिमाखात राज्यभर साजरे करणार, असे विचार सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांनी व्यक्त केले.

तारकेश्वर गडाने आयोजित केलेल्या नारळी सप्ताहातील मोगरा फुलाला या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. व्याख्याते निरूपणकार गणेश शिंदे व गायिका संमिता शिंदे या उच्चशिक्षित जोडी संत ज्ञानेश्वर महाराजांचे चरित्र साध्या सरळ व सोप्या भाषेत श्रोत्यांपर्यंत पोहोचवण्याचा जो प्रयत्न करत आहेत त्यासाठी त्यांचे कौतुक केले. तसेच या मोगऱ्याचा सुगंध या निमित्ताने राज्यभर दरवळेल असा विश्वास आशिष शेलार यांनी व्यक्त केला.

तारकेश्वर गडाच्या सप्ताहाचे त्यांनी कौतुक केले. गडाचे महंत आदिनाथ महाराज शास्त्री यांचे आशीर्वाद घेऊन मी जाणार आहे. पण लवकरच तारकेश्वर गडावर येईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी तालुक्याचे आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांनी त्यांचे स्वागत केले. तालुक्याला असलेली वारकरी संप्रदायाची परंपरा त्यांनी आपल्या मनोगतात मांडली. या प्रसंगी माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे, माजी आमदार विलास लांडे, भंडारा डोंगराचे अध्यक्ष बाळासाहेब काशिद आदी उपस्थित होते.

व्याख्याते गणेश शिंदे व संमिता शिंदे यांनी सादर केलेल्या मोगरा फुलला या कार्यक्रमाने उपस्थित हजारो श्रोते मंत्रमुग्ध झाले. गणेश शिंदे यांच्या खुमासदार शैलीत कित्येकदा श्रोते मनमुराद हसले तर कित्येकदा उपस्थितांचे डोळे पाणवले. सन्मीता शिंदे यांनी सादर केलेल्या बोलावा विठ्ठल, अवघे गरजे पंढरपूर, अवघा रंग एक झाला, या अभंगात श्रोते रंगून गेले. मंत्री आशिष शेलार यांनी महंत आदिनाथ महाराज व निरुपणकार गणेश शिंदे यांच्या सोबत फुगडी खेळत या उस्थवाचा आनंद लुटला.

# आरोग्य विज्ञान विद्यापीठाचा १५ एप्रिलपासून 'स्पंदन' राज्यस्तरीय सांस्कृतिक युवा महोत्सव

नाशिक – विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व सांस्कृतिक कौशल्य वाढीस लागावेत याकरीता महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातर्फे राज्यस्तरीय स्पंदन युवा महोत्सव कार्यक्रमाचे १५ एप्रिलपासून राज्यातील विविध महाविद्यालयात आयोजन करण्यात आले आहे.

विद्यापीठाचे राज्यातील सर्व संलग्नीत महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबर त्यांच्या प्रतिभांची व क्षमतांची ओळख करणे, त्यांच्यामध्ये सांस्कृतीक वृत्ती निर्माण करणे, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी कलाकारांना तयार करणे, विद्यार्थ्यांमध्ये दडलेल्या सुप्त कलागुणांचा विकास करण्यासाठी दरवर्षी विद्यापीठाद्वारे विद्यापीठस्तरीय सांस्कृतीक युवा महोत्सव 'स्पंदन'चे आयोजन करण्यात येते.

नागपूर विभागातील गोविंदराव वंजारी आयुर्वेद महाविद्यालय व संशोधन केंद्र नागपूर येथे १५ ते १६ एप्रिल; नाशिक विभागातील राष्ट्रसंत जनार्दन स्वामी होमिओपॅथीक वैद्यकीय महाविद्यालय कोपरगांव; जि. अहिल्यानगर येथे १८ ते १९ एप्रिल, पुणे विभागातील शारदाबाई पवार इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंग, बारामती, जि. पुणे येथे २१ ते २२ एप्रिल, मराठवाडा विभागातील महाराष्ट्र इन्स्टिटयूट ऑफ फिजीओथेरेपी, लातूर येथे २५ ते २६ एप्रिल, कोल्हापूर विभागातील सिध्दिरी नर्सिंग इन्स्टिटयूट, कोल्हापूर येथे २८ ते २९ एप्रिल, या अंदाजित तारखांना घोषीत करण्यात आले आहे.

विद्यापीठाचा 'स्पंदन-२०२५' सांस्कृतिक युवा महोत्सवात संगीत प्रकारामध्ये सुगम संगीत, पाश्चिमात्य गायन, भारतीय समुहगान, पाश्चिमात्य समुहगायन, लोकसंगीत, पाश्चिमात्य वाद्यसंगीत, नाट्य संगीत तसेच नृत्य प्रकारामध्ये लोक/आदिवासी नृत्य, शास्त्रीय नृत्य तसेच साहित्य कला प्रकारामध्ये सामान्य चाचणी, वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा तसेच नाटयकला प्रकारामध्ये एकांकिका, विडंबन नाट्य, मुकअभिनय समुह, मिमिक्री तसेच ललित कला प्रकारामध्ये जलद चित्रकला स्पर्धा, चिकट चित्र स्पर्धा, भित्तीचित्र स्पर्धा, मृदशिल्प स्पर्धा, व्यंगचित्र स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, स्थळ छायाचित्रण, लघु चित्रपट आदी प्रकारांचा समावेश आहे.

सर्व महाविद्यालयांनी संपूर्ण भरलेली प्रवेशिका ९ एप्रिलपर्यंत विद्यापीठाकडे पाठवावी. या राज्यस्तरीय सांस्कृतीक युवा महोत्सव स्पर्धेत सहभागी होण्यासाठी महाविद्यालयांनी नोंदणी शुल्क जमा करुन विविध २८ कला प्रकारांकरीता विद्यार्थी स्पर्धक, संगीत साथीदार व संघव्यवस्थापक असे संघ पाठवावे. याकरीताचा नोंदणी अर्ज, सुचना नियमावली व माहितीपत्रक विद्यापीठाचे अधिकृत संकेतस्थळ www.muhs.ac.in वर प्रसिध्द करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी ०२५३-२५३९१७१ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.



आयएमएस येथे एमबीएच्या विद्यार्थ्यांसाठी राजेश देशपांडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

# नोकरी-उद्योगात विद्यार्थ्यांना मोठी संधी : राजेश देशपांडे

नगर – बीपीएचई सोसायटीचे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, करिअर डेव्हलपमेंट अॅण्ड रिसर्च (आयएमएस) येथे एमबीएच्या विद्यार्थ्यांसाठी भविष्यातील करिअरमधील संधी या विषयावर राजेश देशपांडे यांचे इंडियन कॅपिटल मार्केट करिअर अॅण्ड इन्व्हेस्टमेंट ऑपॉर्च्युनिटीज हे व्याख्यान आयोजित केले होते.

यावेळी बोलताना राजेश देशपांडे यांनी स्पष्ट केले की, एमबीए होऊन विद्यार्थी जेव्हा बाहेर पडतात तेव्हा उद्योग क्षेत्राकडून सद्यस्थितीत उमेदवाराकडून आर्थिक कौशल्यांची अपेक्षा असते. त्यामुळे गुंतवणूक असो किंवा करियर असो विद्यार्थ्यांनी शिक्षणबाह्य जागतिक आर्थिक घडामोडींची माहिती घेऊन कौशल्य वाढविणे गरजेचे आहे. भारतीय अर्थव्यवस्था सध्या सकारात्मक संक्रमणातून वाटचाल करीत आहे. अडचणी अनेक आहेत परंतु बाजारपेठांचे, व उद्योगधंद्यांचे विश्लेषण करून विद्यार्थ्यांनी स्वतःची कौशल्ये वाढविण्यावर भर दिल्यास छोट्या शहरातील विद्यार्थ्यांसाठीही मोठ्या पगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. भारतात दरडोई उत्पन्न वाढत असल्याने मनी मॅनेजमेंट क्षेत्रात नव्याने संधी वाढत आहेत. यामध्ये त्यांनी म्युच्युअल फंड, पीएमएस, एआयएफ व इतर अनेक गुंतवणूक साधनांची विद्यार्थ्यांना सखोल माहिती दिली. तसेच गुंतवणूक क्षेत्रातील करिअरच्या संधी मिळवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सेबी मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

यावेळी डायरेक्टर डॉ.एम.बी.मेहता, डेप्युटी डायरेक्टर डॉ. विक्रम बार्नबस, डिपार्टमेंट हेड डॉक्टर प्रणिती तलोरे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. डॉ. ऋचा तांदूळवाडकर, डॉ. मनोज कुलकर्णी तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर स्टाफने कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.

# सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचची त्रैवार्षिक निवडणूक बिनविरोध



सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचचे नूतन अध्यक्ष शरद कुलकर्णी यांच्यासह नवीन कार्यकारणी सदस्य.(छाया – हेमंत ढाकेफळकर)

नगर – सावेडी उपनगरामध्ये ३३ वर्षे पूर्वी म्हणजे सन १९९२ मध्ये स्थापन झालेल्या ज्येष्ठ नागरिक मंच संघटनेची त्रैवार्षिक निवडणूक संघटनेच्या कार्यालयात नुकतीच बिनविरोधपणे पार पडली. यावेळी नवीन पदाधिकारी पुढील प्रमाणे निवडण्यात आले.

अध्यक्ष शरद कुलकर्णी, उपाध्यक्ष बलभीम पांडव, स्नेहल वेलणकर, कोषाध्यक्ष बाजीराव जाधव, सहकार्यवाहक मोरेश्वर मुळे व माधवी कुलकर्णी, कार्यकारणी सदस्य संतोष गोरे, हरिश्चंद्र थिगळे, शुभदा जहागीरदार व पुष्पा कोरे यांची निवड करण्यात आली.

यावेळी सुधीर धर्माधिकारी यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले. त्यांना श्री. खर्पे यांनी सहकार्य केले. निवडणूक बिनविरोध करण्याकरता मंचचे मावळते अध्यक्ष आदिनाथ जोशी, उपाध्यक्ष शिवप्रसाद जोशी तसेच जुने आधारस्तंभ सदस्य वसंतराव सोमणी व शरद देशमुख यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

नवीन कार्यकारणी सदस्यांना प्रमाणपत्र व सत्कार सुधीर धर्माधिकारी यांच्या हस्ते करण्यात आला. आजही मंचचे ३५० पेक्षा जास्त सभासद असून नगर मधील असा पहिला ज्येष्ठ नागरिक संघ आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी विविध स्पर्धा, कार्यक्रम, आरोग्य शिबीर, सहली आधी विविध उपक्रम राबविण्याचे मानस नूतन अध्यक्ष शरद कुलकर्णी यांनी यावेळी बोलताना व्यक्त केले.

# सिंधी जनरल पंचायत आयोजित चेटीचंड महोत्सव साजरा




सिंधी जनरल पंचायत ट्रस्टच्यावतीने आयोजित चेटीचंड महोत्सव सावेडी रोडवरील संजोग लॉन्स येथे नुकताच पार पडला. याप्रसंगी बहराणो साहबची पुजा करताना गुरुमुख जगवाणी, महेश मध्यान, प्रदिप आहुजा, पंडीत शर्मा आदी. तसेच या प्रसंगी विविध सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले. यावेळी सिंधी बांधव उपस्थित होते. (छाया – अशोक थदानी)

नगर – सिंधी समाजाचे इष्ट देव झुलेलाल देवजींची १०७५ वी जयंती तसेच सिंधी नववर्षाच्या निमित्ताने येथील सिंधी जनरल पंचायत ट्रस्टच्या वतीने आयोजित 'चेटीचंड महोत्सव २०२५' चा कार्यक्रम सावेडी रोड वरील संजोग लॉन्स येथे नुकताच उत्साहात पार पडला. यात नगर शहर व परिसरातील हजारो सिंधी बांधव सहकुटुंब सहभागी झाले होते. त्यामुळे संजोग परिसर गजबजून गेला होता.

प्रारंभी संजोग येथे उभारलेल्या आकर्षक मंडपात झुलेलाल देवजींच्या बहराणो साहेब ची पूजा, आरती व पल्लवचा कार्यक्रम पार पडला. त्यानंतर विविध खाद्यपेय स्टॉल्स्चे उद्घाटन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले गुरुमुख जगवाणी (जळगाव निवासी) यांच्या हस्ते व सिंधी जनरल पंचायत अध्यक्ष महेश मध्यान यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले.

मेळाव्याच्या मुख्य कार्यक्रमात समाजातील मुला-मुलींचे विविध गुणदर्शन कार्यक्रम तसेच विविध स्पर्धा पार पडल्या. यातील विजेत्यांना पारितोषिक देण्यात आली. स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या स्टाफचे बहुमोल सहकार्य लाभले. सेंट विवेकानंद स्कूलच्या मुला मुलींनी हनुमान चालीसा चे नृत्याविष्कार सुंदरपणे सादर करून उपस्थितांची वाहवाह मिळवली. झुलेलाल देवजींच्या जयंती निमित्त मान्यवरांच्या हस्ते केक कापण्यात आला. तसेच फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. कार्यक्रम स्थळी उपस्थित समाज बांधवांसाठी विविध खाद्यपेय स्टॉल लावण्यात आले होते. ज्यांचा मनमुराद आनंद घेत, एकमेकांच्या गाठीभेटी घेत व नववर्षाच्या एकमेकांना शुभेच्छा दिल्या जात होत्या. मुलांसाठी विविध मनोरंजनाचे साधन व बहुरूपी सोबत मुले धमाल करीत होते. याप्रसंगी उपस्थितांच्या मनोरंजनासाठी तंबोला गेमचे आयोजन करण्यात आले होते. तसेच उपस्थितांसाठी सोडत काढण्यात आली. यातील २१ विजेत्यांना विविध बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रम स्थळी राजकीय क्षेत्रातील अनेकांनी उपस्थित रहात सिंधी बांधवांना चेंडीचंड, झुलेलाल देव जयंती व सिंधी नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या.

मुख्य कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुणे येथील निवेदक ईशान कुमार यांनी खास शैलीत सुंदरपणे निवेदन करीत, विनोदी किस्से सांगत कार्यक्रमाला वेगळी उंची प्राप्त करून दिली. स्पर्धेचे सूत्रसंचालन गोदावरी किरतानी व मनीषा आहुजा यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सिंधी जनरल पंचायत चे कमिटीचे मेंबर्स, सदस्य तसेच अनेक संस्थांच्या सदस्यांच्या सहकार्याबद्दल सिंधी जनरल पंचायतचे अध्यक्ष महेश मध्यान, उपाध्यक्ष सुरेश हिरानंदानी यांनी आभार मानले.



निर्मलनगर भागातील दोन रस्त्याचे स्व.गोपीनाथ मुंडे मार्ग व स्व.रुक्मिणीबाई काळे आज्ञी मार्ग नामकरण पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते झाला.

# स्व.रुक्मिणी काळे आज्जी मार्ग नामकरण

नगर – निर्मलनगर भागातील दोन रस्त्याचे स्व.गोपीनाथ मुंडे मार्ग व स्व.रुक्मिणीबाई काळे आज्ञी मार्ग नामकरण पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते झाला. यावेळी नानासाहेब जाधव, आ. शिवाजी कर्डीले, आ.संग्राम जगताप, आयुक्त यशवंत डांगे, अभय आगरकर, निखिल वारे व गोकुळ काळे, बाबू टायरवाले, संध्याताई पवार, विनीत पाऊलबुद्धे, सुनील त्र्यंबके, रामदास आंधळे, रुपाली वारे, सचिन पारखीसह काळे परिवारातील सर्व सदस्य व नागरिक उपस्थित होते

रुक्मिणी काळे आज्ञी या धार्मिक सामाजिक क्षेत्रात काम करत होत्या. रुक्मिणी बाई काळे आज्ञी तेलीखुंटावर राहत असतांना लंगर बिडी, भिकुसा बिडी मधील बिडी कामगार काम करताना त्याच्यासाठी रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरीचे वाचन करुन अर्थ सांगत असत. त्यामुळे महिला बिडी कामगारांचा कामाचा स्पीड वाढत होता व परमेश्वराच्या नामस्मरणाचा लाभही होत होता. यासाठी त्या कुठलाही मोबदला घेत नसत. हेच व्रत निर्मलनगरला आल्यावरही चालु राहीले. हनुमान मंदिरात पोथी वाचन व भजन सुरु केले. येथील महिलांमध्ये अध्यात्माची गोडी निर्माण केली. परीसरात त्या काळे आज्ञी म्हणून सर्व परीचीत होत्या. म्हणून त्याच्या कार्याची दखल घेऊन हे नामकरण करण्यात आले

# एनएमएमएस शिष्यवृत्ती परिक्षेत आर्यन बर्वे गुणवत्ता यादीत



नगर – आदर्शगाव हिवरेबाजार येथील यशवंत माध्यमिक विद्यालयातील इयत्ता आठवीमध्ये शिक्षण घेत असलेला आर्यन राहुल बर्वे या विद्यार्थ्याने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यावतीने घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षेत एन.एम.एम.एस – एस.सी. गुणवत्ता यादीमध्ये स्थान मिळवले, शासनाने ही शिष्यवृत्ती परीक्षा आर्थिक मागास विद्यार्थ्यांचे इयत्ता बारावी पर्यंतचे शिक्षण पूर्ण व्हावे या हेतूने वार्षिक १२ हजार रुपयांची शिष्यवृत्ती सुरू केली आहे.

आर्यन बर्वेने ही शिष्यवृत्ती प्राप्त केल्याबद्दल त्याचे संस्थेचे अध्यक्ष पदमश्री डॉ. पोपटराव पवार, एस.एम. सी. चे अध्यक्ष एस. टी. पादीर, रो. ना. पादीर, सहदेव पवार, रामभाऊ चत्तर, छबुराव ठाणगे, मंगेश ठाणगे मेजर, राजू ठाणगे मेजर, मुख्याध्यापक मुरलीधर अमृते, दिपक ठाणगे, कैलास खैरे, नंदकुमार झावरे, निता सोनवणे तसेच सर्व ग्रामस्थ व पालकांनी अभिनंदन केले.

# देहराडून येथील राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज प्रवेश परीक्षा अर्जासाठी १५ एप्रिलपर्यंत मुदतवाढ

नगर – महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्यावतीने राष्ट्रीय इंडियन मिलिटरी कॉलेज, देहराडूनच्या प्रवेश परीक्षेसाठी अर्ज करण्यास १५ एप्रिलपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या (पुणे) आयुक्त अनुराधा ओक यांनी दिली आहे. या परीक्षेचे आयोजन १ जून २०२५ रोजी करण्यात आले आहे. यापूर्वी अर्ज स्वीकृतीची अंतिम तारीख ३१ मार्च २०२५ होती. मात्र, आता या मुदतीत वाढ करून ती १५ एप्रिल २०२५ करण्यात आली आहे, असे श्रीमती ओक यांनी कळविले आहे.



आनंद योग केंद्राच्या साधकांनी माऊली सेवा प्रतिष्ठान संचलित मनगाव प्रकल्पाला भेट देऊन निराधार मनोरुग्णांसाठी ७५ हजार रुपयांची आर्थिक मदत दिली.

# आनंद योग केंद्राच्या साधकांची मनगाव प्रकल्पाला आर्थिक मदत

नगर – आरोग्य चळवळ चालविणाऱ्या सावेडी येथील आनंद योग केंद्राच्या साधकांनी माऊली सेवा प्रतिष्ठान संचलित मनगाव प्रकल्पाला भेट देऊन निराधार मनोरुग्णांसाठी ७५ हजार रुपयांची आर्थिक मदत दिली. भान हरवलेले मनोरुग्ण, निराधार महिला व त्यांच्या बालकांसाठी सुरु असलेल्या माऊली सेवा प्रतिष्ठानचे कार्य पाहून सर्व साधक भारावले.

मनगाव प्रकल्पाचे डॉ. राजेंद्र धामणे व डॉ. सुचेता धामणे यांनी मनगाव प्रकल्पाबद्दल उपस्थित साधकांना माहिती दिली. बेवारस मनोरुग्णांसाठी हक्काचे घर बनलेल्या मनगाव प्रकल्पाबद्दल माहिती देताना डॉ. सुचेता धामणे म्हणाल्या की, २८ वर्षांपूर्वी रस्त्यावर फिरणाऱ्या मनोरुग्ण महिला पाहून त्यांना डबे आणून देण्यापासून या प्रकल्पाची सुरुवात झाली. या महिलांना राहण्यासाठी घर, आरोग्य सेवा आणि प्रेम दिले पाहिजे या स्वप्नातून मनगाव प्रकल्प उभे राहिले. यामध्ये मनोरुग्ण असलेल्या आणि त्यांच्यावर अत्याचार झालेल्या महिलांचा देखील सांभाळ केला जाऊ लागला. मन हेलावणाऱ्या विविध मनोरुग्णांच्या व्यथा ऐकून उपस्थित महिलांचे डोळे पाणावले. मनगावमध्ये आज साडेचारशे महिला व चाळीस मुले राहत असल्याचे त्यांनी सांगितले.

आनंद योग केंद्राच्या साधकांनी मनगाव प्रकल्पात राहत असलेल्या आनंद योग केंद्राच्या साधकांनी मनोरुग्ण, निराधार महिला व त्यांच्या बालकांना आपुलकीने जवळ करुन त्यांच्याशी संवाद साधला. येथील सर्व मनोरुग्ण, आजारी महिला स्वावलंबी बनल्या आहेत. दररोज पाचशे महिलांचा स्वयंपाक, साठ गार्यींच्या गोठ्याची जबाबदारी, ऑर्गेनिक भाजीपाला पिकवणे, शेती करणे, बेकरी प्रॉडक्ट बनविणे, संपूर्ण परीसर स्वच्छ ठेवणे, मुलांची जबाबदारी या प्रत्यक्ष कामाची त्यांनी पहाणी केली. तर त्यांच्या दैनंदिन जीवनक्रम जाणून घेतला. माणुसकीच्या भावनेने सुरु असलेल्या कार्याबद्दल आनंद योग केंद्राच्या साधकांनी मनगाव प्रकल्पाचे कार्य पाहून डॉ. धामणे दाम्पत्यांचे कौतुक करुन या सेवा कार्यात सातत्याने हातभार लावण्याचा संकल्प व्यक्त केला.


## रामनवमी निमित्त ६ एप्रिल रोजी 'आज अयोध्या सजली' कार्यक्रम



नगर – श्री गुरुमाऊली संगीत विद्यालयाच्यावतीने रामनवमी निमित्त श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज उपासना संस्थान. कल्याण रोड वरील नेप्ती येथील थोरले श्रीराम मंदिर येथे श्रीराम कथेवर आधारित गायन, वादन, नृत्य, नाट्य व काव्य या कलांचा एकत्रीत असा 'आज अयोध्या सजली' हा अनोखा कलाविष्कार सादर केला जाणार आहे.

६ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाची संकल्पना चंद्रकांत पंडित यांची असून या कार्यक्रमात श्री गुरुमाऊली संगीत विद्यालयाच्या विद्यार्थीनींना नगरचे कलाकार गायन वादनाची साथ संगत करणार आहेत, अशी माहिती विद्यालयाच्या संचालिका नृत्यतपस्वी सौ. वर्षा पंडित यांनी दिली. या कार्यक्रमास उपस्थित राहून या भक्तिमय श्रीराम कथेवर आधारित नृत्य नाटिकेचा आनंद घ्यावा, असे आवाहन श्री गुरुमाऊली संगीत विद्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

## श्रीरामनवमी निमित्त ६ एप्रिलला गीतरामायण कार्यक्रमाचे आयोजन




नगर – श्रीरामनवमी निमित्त गीतरामायण हा कार्यक्रम ६ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वा. माऊली सभागृहात, सावेडी, अहिल्यानगर येथे आयोजन करण्यात आले आहे.

या गीत रामायणात महाकवी ग.दि. माडगुळकर व स्वरतीर्थ सुधीर फडके यांची अजरामर कलाकृती सादर होणार आहे. हे गीतरामायण प्रसाद सोन्याबापु शेटे सादर करणार आहेत. त्यांना सहगायिका सौ. श्रद्धा अमित बाजारे–शेटे, सौ. रेणुका संतोष पवार साथ देणार आहेत. निवेदिका – सौ. विणा दिघे, व्हायोलीन – धनंजय गाडगीळ (सांगली), सिंथे सायजर– सत्यजीत सराफ (संगमनेर), बासरी– सचिन वाघमारे (पुणे), संवादिनी – मकरंद खरवंडीकर, तबला – हर्षद भावे आणि प्रसाद सुवर्णपाठकी, तालवाद्य – कुलदीप चव्हाण यांची साथ मिळणार आहे.

गीत रामायण कार्यक्रम विनामूल्य असून अहिल्यानगर भाविक, रसिक आणि संगीतप्रेमी श्रोत्यांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन प्रसाद शेटे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी मोबाईल नंबर. ८४४६९२५४४३ (प्रणव), ९८५०२५९८६० (प्रसाद) यावर संपर्क साधावा.

## सारीया शेख हिचे रमजानचे महिनाभर उपवास पूर्ण



नगर – शहरातील सारीया वसीम शेख हिने रमजानचे महिनाभर उपवास केले. वयाच्या ८ व्या वर्षी तिने रमजानच्या पवित्र महिन्याचे अन्न, पाणी विना उपवास केल्याने कौतुकांचा वर्षाव होत आहे.

या वर्षी रमजानचे २९ दिवस उपवास होते. तिने दररोज पहाटे सहेरी करुन भक्तीभावाने नमाज अदा केली आणि संध्याकाळी रोजा इफ्तारीने सोडला. तिने दररोज तब्बल तेरा तासांहून अधिक काळ निर्जली रोजा ठेवला होता. तिने केलेल्या रमजान महिन्याच्या रोजाबद्दल नातेवाईक व परिसरातील नागरिकांकडून कौतुक होत आहे.

# अहमदनगर मर्चंटसला ७ कोटींचा नफा; बँकेद्वारे लवकरच 'क्यूआर कोड' सुविधा

### चेअरमन हस्तीमल मुनोत



अहमदनगर मर्चन्टस को–ऑप. बँक आयोजित पत्रकार परिषदेत माहिती देताना चेअरमन हस्तीमल मुनोत. समवेत संचालक मंडळ, अधिकारी.

नगर – स्थापनेची ५३ वर्षे पूर्ण करणारी नगरमधील प्रसिद्ध व्यापारी बँक अहमदनगर मर्चंटस को–ऑप. बँकेला मागील आर्थिक वर्षात ७ कोटी ३ लाखाचा निव्वळ नफा झाला असल्याची माहिती बँकेचे संस्थापक–अध्यक्ष हस्तीमल मुनोत यांनी दिली. या नफ्यातून सभासदांना १५ टक्के लाभांश व कर्मचार्यांना प्रत्येकी ११ हजाराचे बक्षीस दिले जाणार आहे. कोरोनानंतर तीन वर्षांनी यंदा बँकेचा नेट एनपीए शून्य टक्के झाला आहे. दरम्यान, बँकेच्या ग्राहकांना अधिक आधुनिक सुविधा मिळण्यासाठी बँकेचा स्वतंत्र क्यूआर कोड केला जाणार आहे. याद्वारे खातेदारांना अधिक सुलभरित्या त्यांच्या बँक खात्यातील रक्कम देवाण–घेवाण व्यवहार करता येणार आहेत.

१९७३मध्ये स्थापन झालेल्या अहमदनगर मर्चंटस को–ऑप. बँकेने मागील आर्थिक वर्षात केलेल्या प्रगतीची माहिती अध्यक्ष हस्तीमल मुनोत व उपाध्यक्ष अमित मुथा यांनी दिली. तसेच बँकेद्वारे भविष्यात राबवण्यात येणार्या अत्याधुनिक व कॉर्पोरेट डिजीटल बँकींग सुविधांची माहिती सीए–आयपी अजय मुथा यांनी दिली. यावेळी संचालक मंडळ सदस्य तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील पुराणिक व सह मुख्य कार्यकारी अधिकारी नितीन भंडारी उपस्थित होते.

बँकेचा ढोबळ नफा ३९ कोटी १५ लाखाचा असून, एनपीए तरतूद व आयकरसह अन्य तरतुदी वजा जाता निव्वळ नफा ७ कोटी ३ लाखाचा आहे. ढोबळ एनपीए १४ टक्के असून, १३७ कोटींची वसुली बाकी आहे. मात्र, नफ्यातून एनपीए तरतूद केल्याने नेट एनपीए शून्य टक्के झाला आहे. तीन वर्षांनंतर हे यश मिळाले आहे. यामुळे बँकेला शेड्यूल्ड बँकेचा दर्जा मिळेल व त्यानुसार बँकींग सुविधाही वाढतील. बँकेच्या १९६ कर्मचाऱ्यांना बक्षीस दिले जाणार आहे. यंदा ७० टक्के कर्जदारांनी नियमित परतफेड केल्याने त्यांना २६ कोटी ८७ लाखांची व्याज सवलत (रिबेट) दिला गेला आहे.

### ८१ कोटींनी ठेवी वाढल्या

बँकेच्या एकुण ठेवी रक्कम रुपये १४६२ कोटी १६ लाखांच्या झालेल्या असून गत आर्थिक वर्षापेक्षा बँकेच्या ठेवीमध्ये ८१ कोटी ९७ लाखांनी वाढ झालेली आहे. बँकेची एकुण कर्जे रक्कम रूपये ९६८ कोटी ३९ लाखांची झाली असून गत आर्थिक वर्षापेक्षा बँकेच्या कर्जामध्ये १७ कोटी ६२ लाखांनी वाढ झाली आहे. बँकेमार्फत नजरगहाण कर्जाव्यतिरिक्त गृहतारण कर्ज, शैक्षणिक कर्ज, सोनेतारण कर्ज, वाहन कर्ज, वस्तू कर्ज, शेअर्स तारण कर्ज, शॉप/ऑफिस खरेदी कर्ज, कमर्शिअल इमारत बांधकाम कर्ज, स्थावर मिळकत तारण कॅशक्रेडिट, स्वामिनी गृहकर्ज योजना, गृहनिर्माण विस्तार/सुधारणा योजना, टॉप अप कर्ज योजना आदी कर्ज उपलब्ध आहेत. नजरगहाण कर्ज खात्यावरील व्याजदर रिबेट वजा जाता द.सा.द.शे. ९.०० टक्के, सोनेतारण कर्ज २५ लाखापर्यंत ८.०० टक्के, वाहन कर्ज (प्रायव्हेट कार) २५ लाखापर्यंत ८.०० टक्के तसेच गृहतारण कर्ज ७ ते ८.७५ टक्के एवढेच असून ते कोणत्याही नागरी सहकारी बँकेपेक्षा कमी आहे. घर बांधणी कर्जासाठी जास्तीत जास्त कर्ज मर्यादा दोन कोटी आहे, अशी माहिती मुनोत यांनी दिली.

यावेळी बँकेचे संचालक मंडळ सदस्य अनिल पोखरणा, आनंदराम मुनोत, संजय चोपडा, सीए मोहनलाल बरमेचा, किशोर् गांधी, संजय बोरा, संजीव गांधी, किशोर मुनोत, सुभाष बायड, संचालिका श्रीमती मीनाताई मुनोत, श्रीमती प्रमिलाबाई बोरा, संचालक विजय कोथिंबीरे, सुभाष भांड, कर्मचारी प्रतिनिधी जितेंद्र बोरा, प्रसाद गांधी, बोर्ड ऑफ मॅनेजमेंट सदस्य राजेश झंवर आदी उपस्थित होते.

### आधुनिक सुविधा देणार

बँकेच्या सध्या १८ शाखा असून आणखी चार ते पाच नवीन शाखांचा सर्व्हे सुरू आहे. बँकेद्वारे क्यूआर कोड सुविधा सुरू करण्यात आली आहे. मल्टीपल युजर सुविधेद्वारे खातेदाराच्या आणखी एका मोबाईलवर अखंड सुविधा मिळतील. पेमेंट गेट वे प्रकल्पातून विद्यार्थ्यांना शाळांची फी भरता येणार आहे. नेटबँकींग सुविधेत कॉर्पोरेट बँकींग सुविधांचे अपडेशन केले जाणार आहे.नेट बँकींगद्वारे फिक्स डिपॉझीट, मोबाईल बँकींग, पासबुक प्रिंटींग व अन्य आधुनिक सुविधा दिल्या जाणार आहेत. बँकेच्या खातेदार व सभासदांनी रि–केवायसी करवून घेण्याचे आवाहन सीए–आयपी अजय मुथा यांनी केले आहे.

## श्रीराम नवमीनिमित्त घारगावला ६ एप्रिलला मोफत नेत्रतपासणी शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

नगर – नगर–दौंड रोडवरील घारगाव शिंदेवाडी येथे श्रीराम उत्सव समिती व फिनिक्स सोशल फाऊंडेशन यांचे वतीने ६ एप्रिल रोजी श्रीराम नवमी निमित्त मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन येथे करण्यात आले आहे. गरजू रुग्णांनी या मोफत शिबीराचा लाभ घ्यावा, असे आवाहन उद्योजक मधुकर शिंदे यांनी केले आहे.

सदर शिबीरात सर्व रुग्णांची मोफत नेत्रतपासणी करण्यात येऊन ज्या रुग्णांना शस्त्रक्रियेची गरज भासेल अशा रुग्णांवर पुणे येथील बुधराणी हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया करण्यात येईल. रुग्णांची राहणे, जेवणाची मोफत व्यवस्था करण्यात आलेली आहे.

गरजू रुग्णांनी नावनोंदणी व अधिक माहितीसाठी ह.भ.प.विलास महाराज शिंदे, मो.९४०४९७१८२७, जालिंदर बोरुडे मो.नं. ९८८१८१०३३३ यांच्याशी संपर्क साधावा.

## पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचा निवडणूक कार्यक्रम जाहीर

शिर्डी – प्रवरानगर येथील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना संचालक मंडळाचा पंचवार्षिक २०२५–३० साठीचा निवडणूक कार्यक्रम राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण पुणे यांनी जाहीर केला आहे.

निवडणूक कार्यक्रमानुसार ९ मे रोजी मतदान होणार असून १० मे रोजी मतमोजणीनंतर निकाल घोषित केला जाणार आहे. नामनिर्देशन पत्रे निवडणूक निर्णय अधिकारी शिर्डी यांचे कार्यालय, राहाता प्रशासकीय इमारत (राहाता तहसील कार्यालय) पहिला मजला, राहाता येथे ३ एप्रिल ते ९ एप्रिल या कालावधीत साप्ताहिक व शासकीय सुट्टीचे दिवस वगळून सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत मिळतील व स्वीकारण्यात येतील. प्राप्त नामनिर्देशन पत्रांची छाननी ११ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता करण्यात येणार आहे. छाननीनंतर वैध नामनिर्देशन पत्रांची यादी १५ एप्रिल रोजी प्रसिद्ध करण्यात येईल.

उमेदवार १५ ते २९ एप्रिल या कालावधीत अर्ज मागे घेऊ शकतात. माघारीनंतर प्रत्यक्ष निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी व निवडणूक चिन्ह वाटप २ मे रोजी करण्यात येईल. या निवडणुकीसाठी शिर्डी उपविभागीय अधिकारी माणिक आहेर यांची निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून, तर तहसीलदार अमोल मोरे यांची सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याची प्रारूप मतदार यादी २५ फेब्रुवारी व अंतिम मतदार यादी १९ मार्च रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे, असे निवडणूक अधिसूचनेद्वारे कळविण्यात आले आहे.

# ठेकेदाराकडून २५ हजारांची लाच घेताना सरपंचाचा मुलगा लाचलुचपत प्रतिबंध विभागाच्या जाळ्यात; गुन्हा दाखल

नगर – ठेकेदाराला ग्रामपंचायत कडून काम पूर्णत्वाचा दाखला देण्यासाठी ४५ हजार रूपयांची लाच मागणारा वाळुंजच्या सरपंचाचा मुलगा मकरंद गोरखनाथ हिंगे २५ हजार रूपयांची लाच स्वीकारतांना २ एप्रिलला लाचलुचपत प्रतिबंध विभागाच्या पथकाच्या जाळ्यात सापडला.

तक्रारदार ठेकेदारीचा व्यवसाय करणारा असून त्यांना सहा महिन्यापूर्वी वाळुंज ग्रामपंचायत हद्दीत पेव्हर ब्लॉक बसवण्याचे टेंडर बांधकाम विभागाकडून मिळाले होते. हे काम पूर्ण झाल्यानंतर त्यांना दहा लाखाचे बील शासनाकडून मंजुर झाले होते. हे काम पूर्ण झाल्याचा पूर्णत्वाचा दाखला त्यांना वाळुंज ग्रामपंचायतीकडून हवा होता. दाखला देण्याच्या मोबदल्यात सरपंचाचा मुलगा मकरंद हिंगे याने सरपंचाची सही घेऊन देण्याकरीता सरपंचासाठी एक लाख रूपयाची लाचेची मागणी ठेकेदाराकडे केली होती. या संबधी २ एप्रिल ला अहिल्यानगर लाचलुचपत प्रतिबंध विभागास तक्रार मिळाली होती. लाच मागणी पडताळणी दरम्यान आरोपी खाजगी इसम मकरंद गोरखनाथ हिंगे याने पंचासमक्ष तक्रारदारास एक लाख रूपयाची लाचेची मागणी केली. तडजोडी अंती ४५ हजार स्विकारण्याचे मान्य करून पहिला हप्ता २५००० स्विकारण्यास तयारी दर्शवली. अहिल्यानगर येथील बुरूडगाव रस्त्यावरील अहिंसा चौकातील सापळा कारवाई दरम्यान आरोपी मकरंद हिंगे यांनी तक्रारदाराकडून २५ हजार रूपयांची लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले. त्याचे विरूद्ध कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंध विभागाच्या पोलिस अधीक्षक शर्मिष्ठा घारगे याच्या मार्गदर्शनाखाली सापळा पर्यवेक्षण अधिकारी अहिल्यानगर पोलिस उपअधीक्षक अजित त्रिपुटे, सापळा अधिकारी अहिल्यानगर पोलिस निरीक्षक छाया देवरे, सापळा पथक पोलीस नाईक उमेश मोरे, महिला पोलीस हवालदार राधा खेमनार, पोलीस कॉन्स्टेबल सचिन सुद्रुक, चालक पोलीस हेड कॉन्स्टेबल दशरथ लाड यांच्या पथकाने केली.

# माळीवाडा येथील मंदिरातून चोरी

नगर – माळीवाडा येथील ब्राह्मण गल्लीतील शंकर महाराज मंदिरातून एका अनोळखी महिलेने सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास मंदिरातील १ हजार ६५० रुपये किमतीचे पूजेचे साहित्य चोरून नेले. याबाबत कोतवाली पोलीस ठाण्यात चोरीच्या गुन्ह्याची नोंद करण्यात आली.

याबाबत कमलेश लक्ष्मण जंजाळे (वय २६, रा. ब्राह्मण गल्ली, माळीवाडा, अ.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, माळीवाडा ब्राह्मण गल्ली येथील शंकर महाराज मंदिरात सकाळी साडेआठ वाजल्याच्या सुमारास एका अनोळखी महिलेने आत प्रवेश करुन मंदिरातील ६०० रुपये किमतीचा एक तांबे धातूचा लोटा, १०० रुपये किमतीचा तांब्याचा ग्लास, ८०० रुपये किमतीचे तांब्याचे कमांडलू,१५० रुपये किमतीचे तांब्याचे फुलपात्र असे पूजेचे साहित्य चोरुन नेले.

याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात कमलेश जंजाळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अनोळखी महिलेविरुद्ध भारतीय न्याय संहिता ३०३ (२) अन्वये अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली असून, पुढील कारवाई महिला पोलीस हवालदार रोहिणी दरंदले या करीत आहे.

### भरवस्तीत चोरी

शहरातील लोकवर्दळीच्या गजबजलेल्या ठिकाणी भरदिवसा मोटारसायकल चोरी, मंगळसूत्र चोरी, अशा चोरीच्या घटना वारंवार घडतात. परंतु चोरट्यांच्या धाडसीपणामुळे मंदिरेही सुरक्षित राहिली नाहीत. भरवस्तीत असलेल्या मंदिरात चोरी झाल्याने नागरिकात चर्चा होत आहे. यापूर्वी या मंदिरात चोरीची घटना घडली होती, त्यामुळे शहरातील मंदिरेही असुरक्षित असल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

# गाय सोडल्याची विचारणा केल्याने झालेल्या वादातून एकास मारहाण

नगर – घराशेजारी राहणाऱ्या शेजाऱ्यांना गाय सोडली का ? अशी विचारणा केली असता, त्यांच्याबरोबर झालेल्या वादातून सहा जणांनी शिवीगाळ, दमदाटी करीत लाकडी दांडके, लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. ही घटना बारा इमाम कोठला येथे १ एप्रिल रोजी रात्री घडली.

याबाबत तोफखाना पोलीस ठाण्यात शमसोद्दीन जलील शेख (वय ४४, रा. कोठला) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, फरदीन तन्वीर शेख, अल्ताफ बंड्या शेख, फरिद तनवीर शेख, साहिल तनवीर शेख, मोईन तन्वीर शेख, अकील शकील शेख हे सर्व त्यांच्या शेजारी राहत असून ते खोडसाळपणा करुन विनाकारण त्रास देतात. १ एप्रिल रोजी रात्री शमसोद्दीन शेख यांची गाय कोणीतरी सोडून दिली. याबाबत शेख यांनी विचारणा केली असता त्यांच्यात वाद झाले, त्यातून कुरेशी हॉटेलच्या पाठीमागील बाजूस फरदीन शेख याने लाकडी दांडक्याने शमसोद्दीन याच्या पाठीवर, हातावर मारहाण केली व इतरांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन शिवीगाळ दमदाटी करून पोलिसात तक्रार दिली तर जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिली. याप्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात शमसोद्दीन शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन ६ जणाविरुद्ध गुन्ह्याची नोंद केली. पुढील तपास पोलीस हवालदार सुनील आंधळे हे करीत आहे.

## नवीपेठ येथील आनंद पार्श्व प्रि. स्कूलच्या चिमुकल्यांची आगळी वेगळी सहल



नवीपेठ येथील आनंद पार्श्व प्रि. स्कूलच्या चिमुकल्यांची आगळी वेगळी सहल काढण्यात आली.

नगर – कुंदनऋषीजी म. सा. व आलोकऋषीजी म.सा यांचे संस्कार, सेवा, शिक्षा हे पाहिलेले स्वप्न साकारत असून शाळेची प्रगती यशस्वीरित्या सुरू आहे.

आनंद नवकार परिवार ट्रस्ट संचलित श्री आनंद पार्श्वभूमीमधील मुलांनी अनामप्रेम (निंबळक) या संस्थेत भेट देत सहलीचा आनंद लुटला.

लहान चिमुकल्याच्या मनावर संस्कार, सेवा व शिक्षा या सूत्रांचे बालमनावर ठसे उमटविण्यासाठी शाळेने व अनामप्रेम संस्थेने केले आगळ्या वेगळ्या सहलीचे नियोजन केले.

अनामप्रेम (निंबळक) येथे पोहोचताच प्रवीण नवले व सौ. सुरेखा कोतकर यांनी मुलांचे स्वागत करून त्यांची बैठक व्यवस्था केली. त्यानंतर मुलांना खाऊचे वाटप व चहापाण्याची व्यवस्था वर्षा पवार यांनी केली.

लहानच चिमुकल्यांनी नृत्य सादर करून मन उल्हासित केले. बालपणातच मुलांना अनेक प्रकारची ज्ञानाची गरज असते. त्यांच्या ज्ञानात भर पाडण्यासाठी मुलांना वेगवेगळ्या लघुउद्योग संस्थांची भेट देण्यात आली. प्रथम मुलांना नॅपकिन बुके या युनिटमध्ये घेऊन जाऊन प्रत्यक्ष खरेदीचे ज्ञान दिले.

शाळेच्या प्राचार्य प्राचार्य सौ. ज्योती पुरी यांनी मुलांना आवाहन केले की मोठ्या मॉलमधून ऑनलाइन खरेदी करण्याऐवजी कधीकधी अशा संस्थांमधून खरेदी करावे असे आवाहन केले. चप्पल फॅक्टरी व गोशाळा येथे घेऊन जाऊन मुलांना दोन्हीही व्यवसायाची माहिती रेखा जेटला व नूतन पितळे या शिक्षकांनी दिली.

लहान चिमुकल्यांना नैसर्गिक रित्या वॉटर फॉलची केमिकल विरहित उत्तम सोय विष्णू वारकरी, सुरेखा राठोड, रामदास काकडे, मनोज दंडीमे यांनी केली.

सहलीमध्ये लहान मुलांची योग्य सोय तरुणा ढवळे यांनी केली. मुलांना सुखरूपपणे ने–आण करण्याची सोय अक्षय राऊत, बद्रीनाथ कुटे यांनी केली.

सहल यशस्वीरित्या पार पाडण्याचे श्रेय आनंद नवकार परिवार ट्रस्टच्या मॅनेजमेंट व ट्रस्टी सौ. मेघा बोरा, प्राचार्य सौ. ज्योती पुरी, अनामप्रेम संस्थेचे अध्यक्ष इंजि. अजित माने तसेच डॉ. मेघना मराठे व अभय रायकवाड यांचे मार्गदर्शन मिळाले.

## चौघांकडून एकास कोयत्याने मारहाण

नगर – मागील भांडणाचा मनात राग धरुन ३८ वर्षीय मजुरास चौघांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ करीत कोयत्याने पाठीमागून डोक्यात मारुन जखमी केले. ही घटना २ एप्रिल रोजी तपोवन रोड परिसरातील जुना पिंपळगाव रोड ढवण वस्ती जवळ घडली.

याबाबत सोन्याबापु छबू गव्हाणे (वय ३८, रा. हनुमान मंदिरासमोर, शेंडी, अ.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, ते पत्नीसह आईला भेटण्याकरिता जुना पिंपळगाव रोड, ढवणवस्ती वीटभट्टी समोर, तपोवन रोड येथे गेले असता येथे राहणारा साहिल कणगरे (पूर्ण नाव माहित नाही) याने मागील भांडणाच्या कारणावरुन मनात राग धरून त्याच्या तीन अनोळखी साथीदारासह येऊन शिवीगाळ, दमदाटी करीत सोन्याबापु गव्हाणे या कोयत्याने डोक्यात व इतरांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ करीत जीवे ठार मारण्याची धमकी दिली. या मारहाणीत सोन्याबापु गव्हाणे हे गंभीर जखमी झाले.

याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी सोन्याबापु गव्हाणे यांनी दिलेले फिर्यादीवरुन चौघांविरुद्ध मारहाणीच्या गुन्ह्याची नोंद केली.

## मोबाईल चोरुन १ लाख ३६ हजार रुपये केले ट्रान्सफर

नगर – शेतात मजूर म्हणून कामास आलेल्या मजुराने शेतकऱ्याचा मोबाईल चोरून नेऊन मोबाईलमधून वेळोवेळी पैसे ट्रान्सफर करून १ लाख ३६ हजार ६५० रुपये चोरून घेण्याची घटना ३० मार्च रोजी रात्रीच्या सुमारास नगर तालुक्यातील येथे घडली.

याबाबत नारायण मारुती रोडे (वय ५१, रा. हिवरे झरे, तालुका नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, शेतात काम करण्याकरिता पठाडे नावाचा मजूर कामावर आणला असता त्या मजुराने काम करण्याच्या दरम्यान त्यांचा आयक्यू कंपनीचा दहा हजार रुपये किमतीचा मोबाईल चोरुन नेला. त्यानंतर त्या मोबाईलमधून वेळोवेळी १ लाख २६ हजार ६५० रुपये पठाडे (पूर्ण नाव पत्ता माहीत नाही) याने ट्रान्सफर करून चोरून नेले. रोडे हे बँकेत कामानिमित्त गेले असता हा प्रकार त्यांच्या निदर्शनास आला. याबाबत नगर तालुका पोलिसांनी नारायण रोडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन पठाडे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०६ प्रमाणे चोरीच्या गुन्ह्याची नोंद केली. अधिक तपास पोलीस हवालदार वनवे हे करीत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

